अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.१० एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे अंक : १९१ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## महाराष्ट्राच्या राहुलमुळे हैदराबादचा पहिला विजय

हैदराबाद : राहुलच्या त्रिपाठीच्या झंझावाती फटकेबाजीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादच्या संघाला खझङ २०२३ मधील आपला पहिला विजय मिळवता आला. पंजाबने शिखर धवनच्या ९९ धावांच्या खेळीच्या जोरावर १४३ धावांचे आव्हान उभारले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवात चांगली झाली नाही. पण महाराष्ट्राचा राहुल त्रिपाठी फलंदाजीला आला आणि त्याने सामन्याचे पूर्ण चित्रच बदलले. राहुलच्या या अर्धशतकाच्या जोरावर हैदबादला पंजाबवर सात विकेट्स राखत विजय मिळवता आला आणि आपल्या गुणांचे खाते उघडता आले. पंजाबच्या संघाने हैदराबादपुढे विजयासाठी १४४ धावांचे आव्हान ठेवले होते. पण या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवात चांगली झाली नव्हती.

## आयपीएल सामना क्र.१५

Vs

बंगळूरू रॉयल चॅलेंजर्स विरुद्ध लखनौ सुपर जिएंटस्

वेळ : सायं.७.३० वा.

स्थळ : एम.चिन्नस्वामी स्टेडियम बंगळूरू

# अयोध्येत भगवे वादळ, राज्यात टीकेची वावटळ

## शिंदे-फडणवीस यांच्या 'देव' कार्यावरून चाललाय गदारोळ

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमधील अख्खे मंत्रीमंडळ व आमदारांचा लवाजामा या सर्वांनी एकत्रितपणे अयोध्येत रविवारी प्रभू रामचंद्र अर्थात रामलल्लाचे मनोभावे दर्शन घेतले. महाविकास आघाडीच्या नेत्यांवर हल्ला चढवतानाच शिंदे यांनी श्रीरामाची प्रेरणा व उर्जा घेवून महाराष्ट्रात येणार असल्याचा निर्धार केला. अयोध्येतील शिंदे यांच्या रॅलीला मोठा प्रतिसाद मिळालाच, शिवाय सारे शहर भगवेमय झाले होते. हे भगवे वादळ सारा महाराष्ट्र पहात असताना मात्र राज्यात विरोधकांनी टीकेची वावटळ उठवली. राज्यात अवकाळीचे संकट असताना शिंदे-फडणवीस सरकारने देव देव करत राहाणे कितपत योग्य आहे? असा सवाल महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उपस्थित केला आहे.**

शिंदे यांच्या अयोध्या दौऱ्याची चर्चा गेल्या चार दिवसांपासून राज्यात रंगली होती. महाविकास आघाडीचे सरकार असताना तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व त्यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांनी अयोध्येचा दौरा केला होता. ठाकरे पिता-पुत्रांनी आपल्या एकाही आमदाराला सोबत नेले नव्हते.विमानतळावरून त्यांना परत बोलावून घेतले होते. पण शिंदे यांनी सर्व आमदारांना सोबत नेले. हा सौजन्यपणा दाखवून शिंदे यांनी ठाकरेंवर जणू कुरघोडीच केली आहे,असे मानले जात आहे. मंदिरात महाआरती झाल्यानंतर शिंदे यांची प्रेस झाली. त्यावेळी त्यांनी मराठी पत्रकारांशी मराठीतून संवाद साधला तर हिंदी भाषिक पत्रकारांनी त्यांच्यापुढे जेव्हा गुगली टाकायला सुरूवात केली,तेव्हा शिंदे यांनी अस्खलित हिंदीतून बोलत त्या प्रश्नांना सिक्सरच ठोकला. अयोध्येत महाराष्ट्र भवन बांधणार असून त्याला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देणार असल्याची घोषणा करताच,जमलेल्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.





### तर दुकानच बंद होईल..

हिंदुत्व जर सगळ्यांच्या घरात पोहोचले तर त्यांचे कायमस्वरुपी दुकान बंद होईल, अशा शब्दांत शिंदे यांनी राहुल गांधींवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. काही लोक मुद्दाम आणि जाणीवपूर्वक पद्धतीने परदेशात जाऊन देशाची बदनामी करतात. हा एकप्रकारे देशद्रोह आहे. काही लोकांना सावरकरांचा अपमान करण्याबरोबर हिंदुत्वाची ॲलर्जी आहे. हिंदुत्व जर सगळ्यांच्या घराघरांत पोहोचले तर त्यांचे (राहुल गांधी) कायमस्वरुपी दुकान बंद होईल. त्यांचे दुकान बंद होणारच आहे. कारण त्यांचा आकडा आता ४०० वरून ४० वर आला. त्यांनी मोदींवर आरोप केले. मोदींवर ज्यांनी ज्यांनी आरोप केले, त्यांची परिस्थिती काय झाली आहे?याकडेही शिंदे यांनी लक्ष वेधले.

### फडणवीस यांचे आसूड...

राम मंदिर निर्माण कार्याची पहाणी शिंदे-फडणवीस यांनी केली. त्यानंतर हनुमान गढी येथे फडणवीसांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतल्यानंतर धन्य झालो,अशा शब्दात भावना व्यक्त करतानाच त्यांनी विरोधकांवर आसूड ओढले. श्रीराम हे देशाचे आदरस्थान असताना विरोधी नेते प्रभूंच्या जन्माचे पुरावे मागत होते. त्यांना शेवटी घरी बसावे लागले,असे फडणवीस म्हणाले.

### पिता-पुत्रांवर हल्लाबोल

अयोध्येत पोहचताच शिंदे गटाच्या आमदारांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे पिता-पुत्रांवर हल्लाबोल करत टीका केली. मंत्री दीपक केसरकर, संदीपान भुमरे, दादा भुसे, शंभूराज देसाई यांच्यासह गुलाबराव पाटील यांनी ठाकरेंवर निशाणा साधला. महाविकास आघाडीचे सरकार होते, त्यावेळी आम्ही प्रभू श्रीरामाच्या दर्शनासाठी निघालो होतो. मात्र आम्हाला विमानतळावरून परत बोलवण्यात आले होते. आम्हाला अयोध्येत येण्यापासून का रोखण्यात आले याचे उत्तर अजूनही मिळाले नाही,अशी खंत शंभूराज देसाई यांनी व्यक्त केली.

### आमची श्रद्धा शेतकऱ्यांवर

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिकला बोलताना शिंदे सरकारच्या अयोध्या दौऱ्यावर टीका केली. हा श्रद्धेचा प्रश्न असल्याचे सत्ताधारी सांगतात. त्यांची श्रद्धा अयोध्येत आहे. आमची श्रद्धा शेतकऱ्यांवर आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीशी निगडीत आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी पुसत, संकटातून त्याला मदत कसे करता येईल, यावर आमची श्रद्धा आहे. प्रत्येकाचे धोरण वेगळे असू शकते,असे पवार म्हणाले.

### देव देव जरूर करा,पण...

राज्यात अवकाळी नुकसान, कांद्याचे अनुदान याची मदत अजून मिळत नाही. जनतेचे प्रश्न प्रलंबित असताना अयोध्या दौरा कशासाठी? असा सवाल राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी नाशिकमधील एका कार्यक्रमात बोलताना उपस्थित केला. महाराष्ट्रात मंत्री एकही शिल्लक नाही, सगळे अयोध्येला गेले. जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे. देव देव करा, पण अवकाळीचे पैसे शेतकऱ्यांना मिळवून द्या. सत्तेवर योग्य माणूस आपण बसवला नाही तर अशा पद्धतीने सरकार जनतेला वेठीस धरले जातात,अशी टीकाही त्यांनी केली.

### धर्माच्या नावावर पर्यटन...

अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले. अशातच हे सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून धर्माच्या नावावर पर्यटनाला गेल्याचा शाब्दिक हल्ला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत शिंदे-फडणवीस सरकारवर चढवला. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील भाजपचे प्रमुख नेते अयोध्येला गेल्याचे मला दिसले नाही. पण रामाचे जे सत्य वचन आहे, ते तुम्ही कोठून घेणार? तुम्हाला रामाची आठवण आताच कशी झाली? असा सवालली त्यांनी विचारला.

## दत्त नगरात १९ वर्षीय युवकाची आत्महत्या

सुराज्य/मोहोळ



येथील दत्तनगर येथे १९ वर्षीय युवकाने राहते घरी पत्राच्या खाली लाकडी वाशाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी सात नंतर उघड झाली आहे

अनिकेत दशरथ यादव (वय १९) हा एकलकोंड्या स्वभावाचा होता. तो आपल्या आई सोबत मामाच्या घराशेजारी राहण्यास होता. रात्री झोपण्यास मामाच्या घरातील खोलीमध्ये येत होता. ८ एप्रिल रोजी रात्री अनिकेत हा नेहमीप्रमाणे रात्री दहा वाजता मामाच्या घरी झोपण्यासाठी आला. त्यावेळी मामा व अनिकेत यांनी मिळून जेवण केले व तो त्याच्याकडे झोपण्यासाठी गेला. सकाळी उठल्यानंतर सव्वासात वाजता लोक नेहमीप्रमाणे उठल्यानंतर अनिकेतच्या खोलीचा दरवाजा उघडा दिसला म्हणून पाहिले असता पत्र्याच्या खाली असलेल्या लाकडी वाशाला साडीच्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत तो दिसला. आरडाओरडा ऐकून लोक गोळा झाले.

अनिकेतला गळफास सोडवून खाली उतरवण्यात आले. उपचारासाठी मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच तो मयत झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## जुना पुना नाका येथील अपघातात एकाचा मृत्यू; एक जण जखमी

सुराज्य/सोलापूर

जुना पुना येथे शनिवारी रात्री ११ वाजता अज्ञात वाहनाच्या धडकेत आदर्श अमोल बनसोडे (वय १९,रा. रेणुगोपाल नगर) याचा मृत्यू झाला. यात त्याचा मित्र जखमी झाला आहे.

मृत बनसोडे व त्याचा मित्र हे दोघे दुचाकीवरून जात होते. त्यावेळी रात्रीच्या वेळेस अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिल्याने दोघे दुचाकीवरून खाली कोसळले. हा अपघात इतका गंभीर होता की, यात बनसोडे यांच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला. घटनेची माहिती कळताच फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पोलिस हे घटनास्थळी गेले.दरम्यान,रुग्णसेवक लादेन याने बनसोडे याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. दरम्यान, त्याचा मित्राच्या तब्येतीत सुधारणा होत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## विजयपूर-बागलकोट रस्त्यावर भंडारकवठ्यातील युवकाचा अपघाती मृत्यू

सुराज्य/दक्षिण सोलापूर



दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील रहिवासी असलेला उच्च शिक्षित तरुण विनोद आमसिध्द आलबाणे (वय २७) या तरूणाचा विजयपूर-बागलकोट रस्त्यावर अपघाती मृत्यू झाला.बागलकोट येथील येथील मित्राच्या विवाह सोहळा आटोपून परत भंडारकवठे गावाकडे परत येत असताना बागलकोट- विजयपूर रस्त्यावर शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास टँकर व मोटरसायकलच्या अपघातात तो जागीच ठार झाला.

विनोद आलबाणे हा हैद्राराबाद येथील कंपनीत कामाला होता. आपल्या जवळच्या मित्राच्या लग्नासाठी तो कर्नाटकातील बागलकोट येथे विवाहासाठी मोटारसायकवर गेला होता परंतु विवाह आटोपून परत येत असताना विजयपूर -बागलकोट रस्त्यावर एम.एच.०४ ई. वाय.- २५७८ ह्या इंडियन ऑइल कंपनीचे टँकर व मोटरसायकल एम.एच.१३ सी.एन-३३०० या दोन वाहनांमध्ये अपघात झाला. पाठीमागून अपघात झाल्याने विनोद आलबाणे हा धडकेत जागींच ठार झाला. त्याच्या पश्चात आई-वडील,भाऊ, बहीण असा परिवार आहे.

## शेळगीत दोन गटात तुफान हाणामारी

सुराज्य/सोलापूर

शेळगी येथील मित्र नगर येथे दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. यात सहा तरुण जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी दुपारी घडली. यातील सर्व सहाही जखमींना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज शासकिय सर्वोपचार रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.घटनेची माहिती कळताच जोडभावी पेठचे पोलीस हे घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान,हॉस्पिटलमध्ये दोन्ही गटाचे नागरिकांची गर्दी झाली होती.यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल झाले आहे. त्यांनी दोन्ही गटाशी चर्चा केली.दरम्यान,सायंकाळी याबाबबत गुन्हा दाखल करण्यात येत होते.

## मोदी स्टेडियमवर षटकारांचा थरार, केकेआरचा सिंग ठरला हिरो

सुराज्य/अहमदाबाद



यंदाच्या आयपीएलमध्ये रविवारी इतिहास झाला.मोदी स्टेडियमवर शेवटच्या षटकात षटकारांची बरसात पहायला मिळाली. अखेरच्या पाच चेंडूत पाच षटकारांचा पाऊस पाडत करत रिंकू सिंग हा केकेआरच्या विजयाचा हिरो ठरला. अखेरच्या षटकात २९ धावांची गरज असताना रिंकू सिंगने पाच षटकार लगावले आणि संघाला भन्नाट विजय मिळवून दिला. गुजरातने केकेआरपुढे २०५ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान केकेआरने तीन विकेट्स राखत पूर्ण केले.गुजरातचा सोपा विजय सिंगने हिरावून घेतला.

गुजरातच्या २०५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना केकेआरची सुरुवात चांगली झाली नाही. केकेआरची २ बाद २८ अशी अवस्था झाली होती. पण त्यानंतर मात्र वेंकटेश अय्यर आणि नितीष राणा यांची चांगलीच जोडी जमली. वेंकटेश अय्यरने तर यावेळी गुजरातच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले होते. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १०० धावांची भागीदारी रचली. पण यावेळी गुजरातच्या अल्झारी जोसेफने या दोघांनाही बाद केले आणि सामना गुजरातच्या बाजूने झुकवला. अय्यरने यावेळी ४० चेंडूत ८३ धावांची खेळी साकारली. पण त्यानंतर रिंकू सिंगने अखेरच्या षटकात पाच षटकार लगावले आणि संघाला अनपेक्षित विजय मिळवून दिला. रशिद खानने या सामन्यात हॅट्रीक घेतली होती, पण ती वाया ठरली. कारण रिंकूने २१ चेंडूत ४८ धावा करत केकेआरला सामना जिंकवून दिला.

गुजरातकडून कर्णधार राशिद खान याने हॅट्ट्रिक घेतली. आंद्रे रसेल, नारायण आणि शार्दूल ठाकूर यांना राशिद खान याने तंबूचा रस्ता दाखवला. यंदाच्या आयपीएलमधील ही पहिलीच हॅटट्रिक होय. याआधी आयपीएलमध्ये २१ हॅट्रिकची नोंद आहे. राशिद खान याने आयपीएलमधील २२ वी हॅटट्रिक घेतली.

## मोहोळच्या हॉटेल समोर अक्कलकोटच्या चालकाची आत्महत्या


सुराज्य/मोहोळ

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल संकेत समोर ट्रक उभा करून हॉटेलच्या बांधावरील लिंबाच्या झाडाला ट्रक चालकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी पहाटे चारच्या सुमारास घडली.

मौला इब्राहिम मुल्ला (वय ३८, रा.किणी , ता , अक्कलकोट) असे आत्महत्या करणाऱ्या ट्रकचालकाचे नाव आहे. तो लांब पल्ल्याचा ट्रक (क्रमांक एमएच १२, एस एक्स २७६०) सोलापूर वरून पुण्याच्या दिशेने जात होता. अचानक त्याने त्याच्या ताब्यातील वाहन हॉटेल संकेत समोर थांबवले व तेथील वॉचमन बापू जाधव यांना जेवण आहे का,असे विचारले. त्याने जेवण बंद आहे, असे म्हटल्यानंतर कोणास काही न बोलता हॉटेलच्या पाठीमागे निघून गेला आणि हॉटेलच्या पाठीमागील असलेल्या बांधावर एका लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना हॉटेलचे वॉचमन बापू जाधव हे पाण्याचे वॉल चालू करण्यासाठी गेले असता त्यांना दिसताच एकच गोंधळ उडाला. वॉचमन बापू जाधव यांनी हॉटेलचे मालक आणि मॅनेजर यांना दिली. त्यांनी मोहोळ पोलिसांना कळवताच पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली. मोहोळच्या शासकिय रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन करण्याकरिता पाठवून दिला. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. त्याने आत्महत्या का केली, याबाबतचा तपशील कळू शकला नाही. सदर घटनेचा अधिक तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता हे रस्ते दुरुस्त कोण करणार?

## शहराला पाणीपुरवठा एक दिवस उशीरा होणार

- उजनीजवळ विद्युत पुरवठा खंडित झाल्याने पाणीपुरवठा विस्कळीत
- उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी कामाच्या पूर्व नियोजनासाठी आयुक्तांनी केली पाहणी

सुराज्य/सोलापूर

उजनी जवळील माने गावाजवळ एमएसईबीच्या पोलवर वीज कोसल्यामुळे काल रात्री ९ वाजल्या पासून उजनी पंप हाऊस येथील वीजपुरवठा खंडीत झाला आहे. त्या ठिकाणी आज महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी पाहणी केली.अद्यापही वीज पुरवठा सुरू नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर वीजपुरवठा सुरू करण्यासंदर्भात सूचना दिल्या.

दरम्यान, वीजपुरवठा खंडित असल्यामुळे सोलापूर शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. एक दिवस पाणी पुरवठा पुढे जाणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घ्यावी. नागरिकांना पाणी जपून वापरावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांनी केले.

### दुहेरी जलवानीचे काम लवकरच

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी १७० एमएलडी पाणी पुरवठा योजनेचे काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आज पूर्व नियोजनासाठी पंपिंग हाऊस, जॅकवेल,उजनी येथील इंटकवेल,नवीन होणारे १७० एमएलडीचे इंटकवेल, कॉपर डॅम, नवीन होणारे १७० एमएलडीचे बी.पी.टीची जागा, एक्सप्रेस फीडर लाईन, सध्या सुरू असलेल्या खंडाळा येथील बी.पी.टीची जागा आदी ठिकाणाची पाहणी करून आयुक्तांनी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यकरी अभियंता विजय राठोड, उपअभियंता व्यकटेश चौबे, उपअभियंता नीलकंठ मठपती, सहायक अभियंता संतोष यलगुलवार, अवेक्षक गणेश काकडे, इलेक्ट्रिक सुपरवायझर नितीन आंबीकर आदी उपस्थित होते.

# आत्मनिर्भर भारत...

गेल्या काही वर्षांत अंतराळ अर्थव्यवस्थेत भारताने आपले स्थान निर्माण केले आहे. इस्रोच्या 'एलव्हीएम३' या सर्वांत मोठ्या प्रक्षेपकाच्या मदतीने ब्रिटनस्थित 'वनवेब कंपनी'च्या ३६ इंटरनेट उपग्रहांचे नुकतेच प्रक्षेपण करून भारताने आपली क्षमता सिद्ध केली. चीन आणि रशिया आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिकूलतेचा सामना करत असताना भारताला या क्षेत्रात आणखी झेप घेण्याची संधी आहे,असे या क्षेत्रातील जाणकार सांगतात. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोची व्यावसायिक उपशाखा म्हणून २०१९मध्ये 'न्यू स्पेस इंडिया लिमिटेड' ची स्थापना करण्यात आली. या कंपनीने आतापर्यंत ५२ आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठी उपग्रह प्रक्षेपणाची सेवा दिली. व्यावसायिक क्षेत्रविस्तार लक्षात घेऊन इस्रोने 'स्मॉल सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल' (एसएसएलव्ही) विकसित केले आहे. मागणीनुसार प्रक्षेपण सेवा प्रदान करणे, हा त्याचा उद्देश आहे. गेल्या आर्थिक वर्षात कंपनीने १७ अब्ज रुपयांचा महसूल मिळवला. त्यातून ३ अब्ज रुपयांचा निव्वळ नफा झाला. भारताने २०२०मध्ये अंतराळ क्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले करण्याचा निर्णय घेऊन जागतिक व्यावसायिक अंतराळ क्षेत्रात आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला आहे. 'न्यू स्पेस इंडिया लिमिटेड'ने 'वनवेब'च्या ३६ उपग्रहांचे गेल्या महिन्यात प्रक्षेपण केले. त्याआधी ऑक्टोबरमध्येही ३६ उपग्रहांचे प्रक्षेपण करण्यात आले होते. वेगवान इंटरनेटच्या वाढत्या मागणीमुळे उपग्रह प्रक्षेपणाचा व्यवसाय तेजीत आहे. २०२०मध्ये अंतराळ अर्थव्यवस्था ४४७ अब्ज डॉलर्सची होती. ती २०२५ पर्यंत ६०० अब्ज डॉलर्सवर जाईल, असा अंदाज आहे. त्यासाठी अमेरिका, रशिया, चीन यांच्यात स्पर्धा असली तरी भारताला मोठी संधी असल्याचे मानले जाते. अंतराळ अर्थव्यवस्थेत भारताचा हिस्सा सध्या दोन टक्के आहे. व्यावसायिक उपग्रह प्रक्षेपणाद्वारे २०३०पर्यंत हे प्रमाण १० टक्क्यांवर नेण्याचा भारताचा संकल्प आहे. 'वनवेब' कंपनीच्या मोहिमेमुळे जागतिक दळणवळण उपग्रहांच्या प्रक्षेपणामध्ये भारताचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले आहे. परदेशी कंपन्या भारताकडे विश्वासार्ह पर्याय म्हणून पाहात आहेत. सध्या व्यावसायिक अंतराळ प्रक्षेपणात चीनचा वाटा मोठा आहे. मार्च २०२० पर्यंतच्या आकडेवारीनुसार, प्रक्षेपित उपग्रहांपैकी १३.७ टक्के चीनचे आहेत. भारताचे केवळ २.३ टक्के आहेत. गेल्या वर्षी चीनने ६४ प्रक्षेपणे केली. 'गॅलेक्सी स्पेस'सारख्या काही चिनी खासगी कंपन्या स्वत: उपग्रह प्रक्षेपित करतात. भारतात गेल्या वर्षी पाच प्रक्षेपणे झाली. ती एकतर इस्रो किंवा 'न्यूस्पेस इंडिया' कंपनीने केली. गेल्या काही वर्षांतील भारताच्या उपग्रह प्रक्षेपणाच्या यशस्वितेचे प्रमाण ७० टक्के आहे. अमेरिका, रशिया, चीन या देशांत हे प्रमाण ९० टक्के आहे. त्यामुळे भारतातून उपग्रह प्रक्षेपणात अधिक जोखीम असूनही अनेक परदेशी कंपन्यांचा भारतावर विश्वास आहे. भारतातून प्रक्षेपण खर्च कमी असणे, हे त्यामागचे एक कारण आहे. २०१३मध्ये नासाच्या मंगळ मोहिमेच्या फक्त दहा टक्के खर्चात भारताने मंगळयान मोहीम फत्ते केली. कमी खर्चात प्रक्षेपण हे भारताचे बलस्थान ठरले आहे. उद्योगपती इलॉन मस्क यांच्या 'स्पेसएक्स' कंपनीबरोबरच चीन आणि रशिया हे मुख्यत्वे उपग्रह प्रक्षेपण सेवा पुरवतात. मात्र, युक्रेन युद्धामुळे रशिया आणि अमेरिकेबरोबरच्या तणावामुळे चीन अनेक आंतरराष्ट्रीय ग्राहक कंपन्या गमावू लागला आहे. रशियाशी व्यवहार फिसकटल्याने 'वनवेब'ने भारताशी उपग्रह प्रक्षेपण करार केला होता. फ्रान्सच्या एरियनस्पेसने प्रक्षेपणासाठी नवा प्रक्षेपक सज्ज नसल्याचे जाहीर केले आहे. तसेच ब्रिटिश अब्जाधीश रिचर्ड ब्रॅन्सन यांच्या व्हर्जिन ऑर्बिट होल्डींग कंपनीने जानेवारीमधील प्रक्षेपण अपयशी ठरल्याने आपली सेवा अनिश्चित काळासाठी स्थगित ठेवली आहे. 'स्पेसएक्स' हे महागडे असून, सर्वाधिक व्यग्र आहे. ही परिस्थिती भारताच्या पथ्यावर पडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सर्वच क्षेत्रांच्या बाबतीत भारताला आत्मनिर्भर करण्याचा निर्धार केला आहे. त्यांच्या सरकारने संरक्षण, अण्वस्त्र आणि तंत्रज्ञान निर्मितीकडे विशेष लक्ष दिले असून भारतात जे टॅलेंट आहे, त्याला प्राधान्य दिले आहे. त्यातूनच संरक्षण दलासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री निर्मितीत आपण पुढे चाललो असून अण्वस्त्र क्षेत्रातही मैलाचा दगड पार करत आहोत. आपल्याकडील टॅलेंटचा सरकारने विचार केला नाही तर ही बुद्धिमत्ता बाहेरच्या देशात जाऊ शकते. यापूर्वी असेच झाल्याने देशाला त्याचा मोठा फटका बसला आहे, पण आता आत्मनिर्भरता सिद्ध होऊ लागली आहे. त्याने देशाची मान उंचावू लागली आहे.



जयंतीविशेष

# होमिओपॅथीक शास्त्राचे जनक


**होमिओपॅथीक शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या २६८ व्या जयंतीनिमित्त आज ( दि. १० एप्रिल) रोजी येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज बीडचे माजी प्राचार्य/संचालक व केंद्रिय होमिओपॅथीक परिषदेचे माजी उपाध्यक्ष डॉ. अरूण भस्मे यांनी अनेक ग्रंथाच्या आधारे अनुवादीत केलेला डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा हा लेख...**

भौतिक विकासाने गुंग झालेल्या आजच्या जगातील जनतेला सत्याची मांडणी करताना देखील विचारांची दिशा भौतिक आधारावरच बसविण्याची इच्छा होते. वास्तविक पाहता सत्य शोधण्याची अथवा सिध्द करण्याची आवश्यकता पडू नये. कारण सत्य हे सत्यच आहे. परंतु असत्याचा प्रभाव आजपर्यंत सत्यासंबधी विश्वास असताना कोणीही नाहीसा करु शकला नाही. अणुच्या विभाजनाने उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा महाभयंकर प्रताप आजच्या अणुयुगात विकासाला व नाशाला किती प्रमाणात प्रभावी ठरु शकतो. याचा अनुभव डोळयासमोर दिसल्याने प्रत्येक व्यक्ती या सिध्दांताच्या संशोधकाला जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांच्या मालिकेत नेऊन बसविते. त्याचप्रमाणे प्रत्येक पदार्थातील अणूंचे विभाजन कालमर्यादेपर्यंत नेणे सत्य आहे व ते विभाजन रोगी, दुःखी, जनतेला सदृढ आरोग्य देण्याचे साधन आहे. सिध्दांच्या प्रयोगाने व सिध्दीकरणाने सिध्दांत मांडणारा डॉ. सॅम्युअल हॅनिमन जनतेच्या दरबारात उच्च सिंहसनावर जाऊन बसला आहे.

महापुरुष कोणत्याही शाळेत किंवा कारखान्यात तयार होत नसतात. ते परमेश्वरी प्रेरणेने उत्पन्न होत असतात व त्यांची उत्पत्ती ही जगाच्या कल्याणाकरिताच असल्याने त्यांच्या मार्गात येणारी सर्व संकटे नाहीशी होऊन सत्याचा परिचय जगाला देत असतात. असा आरोग्य शास्त्रात क्रांती करणारा जनतेच्या सदृढ आरोग्याचे साधन व तत्व सांगणारा महापुरुष १० एप्रिल १७५५ साली जर्मनीतील सॅक्सोनी खेड्यात मातीच्या भांड्यांना रंग देणाऱ्या गरीब बापाच्या पोटी जन्माला आला. महापुरूषाची उत्पत्ती त्यांनी केलेल्या कार्याची शहानिशा करतात.

डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांचे मनाने ज्ञानलालसेची इच्छा असल्याने मिळेल, त्यावेळेचा व संधीचा योग्य उपयोग करून त्यांनी आपले ज्ञानार्जनाचे कार्य चालू ठेवले. तीव्र इच्छाशक्ती व महान परिश्रम करण्याची तयारी असताना परमेश्वरी प्रेरणा ही सहाय्यभूत झाली. परिणामतः वयाच्या १२ व्या वर्षी ते आपल्या अनुयायांना ग्रीक भाषा समजावून देऊ लागले. वयाच्या २० व्या वर्षी ३ परदेशी भाषा व अनेक विषयात त्यांनी प्राविण्य मिळविले. आपल्या मुलाची ज्ञानाची इच्छा पाहून त्यांच्या पित्याने १७७५ साली लरिपझिप विद्यापीठात वैद्यकीय शिक्षण घेण्याची परवानगी दिली. तेथे उपजीविकेसाठी शिकणे व शिकवणी सुरू होते. रात्री भाषांतर करणे व फुरसतीच्या वेळी इतरांना शिकविणे हा त्यांचा नित्यक्रम होऊन बसला. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांचे अकरा भाषेवर प्रभुत्व होते. १० ऑगस्ट १७७९ साली त्यांनी एरलँजेन विद्यापीठाची एम. डी. ची डिग्री मिळविली.

दिनी प्रतिदिनी येणाऱ्या अनुभवामुळे त्यांना असे वाटले की- ते करीत असलेल्या रोगासंबंधीचा विचार हा परिपूर्ण नसून पुस्तकी ज्ञानावर व पर्यायाने रोगासंबंधी अज्ञानावर आधारित आहे. त्यावर कराव्या लागणाऱ्या औषधाचे कार्य हे सुद्धा आज्ञानावर आधारित आहे. या तीव्र औषधाचा वापर आरोग्य देण्याऐवजी



मृत्युलाच आवाहन करीत आहे. अशाप्रकारे ॲलोपॅथी करणारे प्रामाणिक 'चिकित्सक' या नात्याने जनतेची दुःखे वाढविणारा व पर्यायाने एक खुनी म्हणून त्यांच्या हृदयात एक कंप सुरू झाला व त्यामुळे त्यांनी चिकित्सा करणे सोडून रसायनशास्त्र व साहित्य विषयातच आपले लक्ष घातले.

भावना व सत्तेची जोड असणारी व्यक्ती सदैव गुणी प्रकती असते. त्या काळी चिकित्सेच्या पद्धती या भयानक व अपरिपक्व होत्या. राजाश्रयामुळे त्यांना राजमान्यता मिळालेली होती सामाजिक मान्यता व बुध्दीमत्ता या दोन्ही गुणामुळे डॉ. सॅम्युअल हॅनीमन यांनी आपल्या मनाचे व प्रमाणिकतेचे विरुद्ध अगणित संपत्ती त्यांना मिळणे शक्य झाले असते.परंतु मनाच्या प्रामाणिकतेचा प्रभाव त्यांना अधोगतीकडे नेत असताना ते आपल्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत.

विल्यम क्युलेन यांच्या 'मटेरिया मेडिका' या पुस्तकातील सिंकोना बार्क या विद्यापीठांमध्ये औषधाच्या निरोगी मनुष्यात मलेरियाचा ताप लक्षणे उत्पन्न होतात व त्याच्याच सूक्ष्म भाग घेतल्याने ती लक्ष नाहीसे होतात हे त्यांनी वाचले.तेवढ्यावर त्यांचे समाधान झाले नाही तर त्यांनी स्वतःवर सिंकोना सालीचा रस काढून तो रस स्वतःवर घेतल्यानंतर काही वेळात त्यांच्यावर मलेरियाची लक्षणे उत्पन्न झाली व ते औषध कोणते त्यांची लक्षणे नाहीशी झाली. या संबंधाचा विचार त्यांना अस्वस्थ करावयास लागला. ही घटना लिपझिक येथे १७९० साली घडली. अत्यंत सूक्ष्मपणे निरक्षण व प्रयोग करून काही प्रयोग स्वतःवर, स्वतःच्या कुटुंबीयांवर, मित्रावर करुन सिंकोना बार्ग प्रमाणेच सर्व औषधांच्या कार्याची परिमिश्रण त्यांना समान दिसले.

१७८२ साली डेस्सु येथे जेव्हाना कुचलर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. नंतर त्यांनी चिकित्सा करण्यास सुरुवात केली. ध्येयासंबंधी जिद्द व वाढत्या जबाबदाऱ्या यामुळे प्रतिदिन दारिद्र्यात वृध्दी होत होती. १७९१ साली त्यांना खेड्यात जावे लागले. अशा परिस्थितीत त्यांची मुले आजारी पडली व सर्वे भयानक आपत्तींना तोंड देत असताना आपल्या ध्येयावर अधिष्ठित राहून त्यांनी रोगमुक्तीचा सिद्धांत त्यावेळी शोधून काढला. प्रत्येक प्रयोगाचा निष्कर्ष एकच होता की- भोतिक अवस्थेतील प्रत्येक औषध सुदृढ व्यक्तीच्या प्रकतीवर आजार उत्पन्न करते आणि त्याच औषधाचा सूक्ष्मभाग त्या रोगाचा रोग नाहीसा करतो. अशाप्रकारे आरोग्य जगतात चिकित्सेचा नवीन सिद्धांत 'समःसम शमयति' जन्म पावला.

कोणत्याही महान व्यक्तीचा इतिहास हा त्यांच्या मार्गात येणाऱ्या भयंकर अडचणी स्वजनातून उपहास, सामाजिक रचनेकडून बहिष्कार इ. सर्व संकटांनी ग्रस्त असतो व त्या सर्वांवर विजय मिळवून प्रत्येक तत्वेला आपल्या ध्येय सिद्धांतात यशस्वी होतो.

दुःख, दारिद्र्य प्रत्येक कलेची जन्मदात्री आई आहे हीच गोष्ट डॉ. सॅम्युअल हॅनीमन यांच्या बाबतीत प्रकर्षाने अनुभवास आली. जीवनाचे प्रत्येक कार्य हे काव्य म्हणून घेण्याकरिता दारिद्र्य व परिश्रम या द्वारे प्रगट होते. त्यानंतर त्यांनी 'ऑरगॅनन ऑफ मेडीसीन' हे पुस्तक लिहून प्रकाशित केले. त्या पुस्तकात होमिओपॅथीची तत्त्वे सांगितली आहेत ही तत्वे कधीही न बदलणारे आहेत व ती निसर्गावरच अवलंबून आहेत.

पॅरिस येथे अत्यंत सुखात असताना डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांनी २ जुलै १८४३ रोजी इहलोकांची यात्रा संपविली व मृत्युसमयी त्यांनी म्हटले, मी व्यर्थ जगलो नाही. चिकित्सा शास्त्राच्या इतिहासात डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्याशी तुलना करणारी, चिकाटी व सातत्य यांची तीव्रता, शास्त्रीय तत्त्वज्ञान यासंबंधी उच्चतम दृष्टिकोन असलेल्या तत्वेता झाला नाही. स्वतःच्या अक्षरात ५०० पानाचे असे २५ पुस्तके लिहिली १०० औषधांचे सिद्धीकरण केले.

साधे व त्यांचे ओजस्वी जीवन हे भावी पिढीला पथदर्शक ठरणार आहे प्रत्येक गरीब दुःखी व कष्टी रोगी होमिओपॅथीचा तात्कालीक गुण देणाऱ्या व कायम रोगमुक्त करणाऱ्या स्वस्त औषधामुळे डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या पवित्र आत्म्याला चिरंतन शांती देण्याची प्रार्थना करीत आहे.

**- डॉ. अरुण भस्मे.**

टुडेज् ब्लॉग

# विषामध्ये विरघळत चालले जीवन

आज आपण ज्या आधुनिकतेची फुशारकी मारतो आणि आपण ज्या वातावरणात गुदमरल्यासारखे राहतो, ते वातावरण एखाद्या मंद विषासारखे आहे, जे आपले शरीर कमकुवत करून आपल्याला गंभीर आजारांनी मारून टाकते. मंद विष म्हणजे प्रदूषण, वाढते काँक्रीटचे जंगल, भेसळ, नैसर्गिक साधनसंपत्तीचे अतिशोषण, कमी होत जाणारे वनक्षेत्र, वाहने आणि यांत्रिक उपकरणांचा अतिवापर, मादक पदार्थांचे व्यसन, घोंघाटा, प्लास्टिक आणि घातक रसायनांचा वाढता वापर, ई-कचरा, वैद्यकीय कचरा, अशुद्धता अशा समस्यांशी आहे, ज्यामुळे पर्यावरण प्रदूषित होऊन आरोग्यास समस्या निर्माण होतात. आपल्यावर कोणी थेट हल्ला केला किंवा इजा केली तर आपण त्याचा तीव्र विरोध करतो, पण अप्रत्यक्षरीत्या म्हणजे भेसळ किंवा प्रदूषणाने, कोणी आपल्याला मारले तरी, आपण बहुतेक मूकपणे सहन करतो. अप्रत्यक्षपणे प्रदूषणाचे विष प्राणघातक रोग निर्माण करून आपला जीव घेते.

चांगल्या आरोग्याला चालना देऊन प्रत्येक माणसाला उत्तम उपचार उपलब्ध करून देण्यासाठी आणि जगभरातील आरोग्यविषयक आव्हानांना तोंड देऊन आरोग्य कल्याणाच्या योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना ०७ एप्रिल १९४८ रोजी करण्यात आली. यावर्षी २०२३ ला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्षीची थीम सर्वांसाठी आरोग्य आहे. शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगभरातील सुमारे ९३० दशलक्ष लोक आरोग्यावर घरगुती बजेटच्या १०% किंवा त्याहून अधिक खर्च केल्यामुळे गरिबीत जाण्याचा धोका आहे. उद्योग, वाहतूक, कोळसा ऊर्जा प्रकल्प आणि घरगुती इंधनाचा वापर यांचे वायू प्रदूषणात मोठे योगदान आहे. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवा हस्तक्षेप वाढवल्यास २०३० पर्यंत ६० दशलक्ष लोकांचे जीव वाचू शकतो आणि सरासरी आयुर्मान ३.७ वर्षांपर्यंत वाढवता येऊ शकते. यासाठी ३७० अब्ज डॉलर अतिरिक्त गुंतवणूक आवश्यक आहे. आपण श्वास घेत असलेली हवा धोकादायकरित्या प्रदूषित होत आहे, आता दहापैकी नऊ लोक प्रदूषित हवेत श्वास घेतात, ज्यामुळे दरवर्षी ७ दशलक्ष अकाली मृत्यू होतात. वायू प्रदूषणामुळे पक्षाघात, फुफ्फुसाचा कर्करोग आणि हृदयविकारामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी एक तृतीयांश मृत्यू होतात. घरगुती वायू प्रदूषणामुळे वर्षाला ४ दशलक्ष लोकांचा मृत्यू होतो. जगभरात, ५ ते १८ वयोगटातील १४% मुलांना वायू प्रदूषणामुळे दमा होतो. दरवर्षी, ५ वर्षांखालील ५लाख ४३,००० मुले वायू प्रदूषणाशी संबंधित श्वसन रोगांमुळे जीव गमावतात. द लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासानुसार, २०१९ मध्ये प्रदूषणामुळे भारतात २.३ दशलक्ष अकाली मृत्यू झाले. सुमारे १.६ दशलक्ष मृत्यू केवळ वायू प्रदूषणामुळे झाले आणि ५लाखाहून अधिक जल प्रदूषणामुळे झाले. आवर वर्ल्ड इन डेटा च्या वेबसाईटवर नुकतेच प्रकाशित रिपोर्ट्सनुसार, भारताने २०१५ ते २०२० पर्यंत ६लाख ८४हजार हेक्टर जंगल गमावले, ९८ देशात भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. प्रदूषित वातावरणाचा सर्वात वाईट परिणाम खालच्या वर्गातील लोकांवर होतो. कारण उच्च राहणीमान परवडत नाहीत त्यामुळे त्यांना आरोग्याशी संबंधित समस्यांना तोंड द्यावे लागते.


भारत आज जगातील सर्वात प्रदूषित देशांपैकी एक आहे. वायू प्रदूषणामुळे जागतिक आयुर्मान सुमारे २.२ वर्षांनी आणि भारतात सरासरी आयुर्मान ६.३ वर्षांनी कमी होते, देशातील काही भागात सरासरीपेक्षा वाईट परिस्थिती आहे, अशा भागात आयुर्मान १० वर्षांपेक्षा कमी आहे. थेट सिगारेटच्या धुराच्या संपर्कात आल्याने जागतिक सरासरी आयुर्मान अंदाजे १.९ वर्षे कमी होते. भारत वायू प्रदूषणासाठी डब्ल्यूएचओने ठरवलेल्या मानकांची पूर्तता करण्यात अपयशी ठरतोय, देशात मोठ्या प्रमाणात प्रदूषण आहे.

भारतातील सुमारे ७०% भूपृष्ठावरील पाणी मानवी वापरासाठी अयोग्य आहे. दररोज, सुमारे ४० दशलक्ष लिटर सांडपाणी नद्या आणि इतर पाण्याच्या स्रोतात प्रवेश करते. वाढत्या शहरीकरणामुळे जलसाठेही विषारी होत आहेत.

**(पूर्वार्ध) - डॉ. प्रितम गेडाम.**

जन्म हा अखेरचा

# कायानुग्रहस्थल - २



शरीरात राहणारा आत्मा शस्त्राने कापला जात नाही, अग्नीत जळून जाते, आत्मा त्या विकारापासून अलिप्त असतो. ही सामान्य गोष्ट आहे. कधी कधी भगवद्चिंतनात रममाण झालेल्या भक्ताच्या शरीरावर देखील शस्त्रादिकाचा प्रभाव पडत नाही. हे भक्त प्रल्हाददी भक्तांच्या कथांवरून दिसून येते. शरीराचा अभिमान धरल्यामुळे मनुष्याला सुख-दु:ख भोगावे लागते. शरीरदोषांपासून अलिप्त राहणाऱ्या शिवयोग्याची मूर्ती आपल्यासमोर उभी करुन तुम्ही देखील योगी व्हाल, असा संदेश ज. रेणुकाचार्य आपल्याला देत आहेत. योगी व्हायचे असेल , मुक्ती मिळवायची असेल तर शरीराचा अभिमान सोडायला हवा.

आशीर्वचन संपल्यानंतर तुम्ही तुमच्या घरी जाता. तुम्ही स्वत:च्या घरीच का जाता? दुसऱ्याच्या घरी का जात नाही? कारण घराविषयी तुम्हाला अभिमान असतो. एखाद्या अदृश्य दोराप्रमाणे अभिमान आपल्याला घराकडे खेचून नेतो. अभिमानरुपी दोराने बांधलेला पशू म्हणजे मनुष्य. या अदृश्य बंधनालाच 'राग' असे दुसरे नाव आहे. 'राग' म्हणजे आसक्ती. अशा सहस्त्रावधी दोरांनी मनुष्य बांधलेला असतो. जो दोर खेचला जाईल, तिकडे मनुष्याला पळावे लागते. योगी आणि संसारी यांच्यात एवढाच फरक आहे की, योगी शरीरात राहून देखील शरीरापासून अलिप्त असतो आणि संसारी मनुष्य शरीरातच गुरफटलेला असतो. शरीर हाच आत्मा आहे असे त्याला वाटत असते. शरीरात 'मी' आहे हे बऱ्याच जणांना माहीत नसते. शरीर म्हणजे 'मी' आहे असेच त्यांना वाटत असते.

याचा अधिक विचार केला तर असे दिसते की, काही लोक शरीरालाच नव्हे तर शरीराशी संबंधित असलेल्या व्यक्तींना आणि वस्तूंना देखील आत्मा मानतात. वेदांत शास्त्रात म्हटले आहे. 'पुत्रात्मा कलत्रात्मा क्षेत्रात्मा धनात्मा इंद्रियात्मा शरीरात्मा.' कोणी पुत्राला, कोणी कलत्राला, कोणी शेतीला तर कोणी धनाला आपला आत्मा मानतात. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर

पाकिस्तानात सध्या महागाईने कहर गाठला असून लोकांना जगणे मुश्कील झाले आहे. याला दोन कारणे आहेत. एक म्हणजे आर्थिक अस्थिरता व दुसरे म्हणजे राजकीय अस्थिरता महागाई पराकोटीला गेली आहे.

पाकिस्तानातील महागाईचा दर ४७ टक्क्यांवर पोहचला आहे. लोकांना जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत इतकेच काय पण औषधेसुद्धा दुर्मिळ होऊ लागली आहेत. सरकारकडे काही दिवस पुरेल इतकेच परकीय चलन उपलब्ध आहे. अनेक कंपन्या बंद आहेत तर त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे. गव्हाचा प्रचंड तुटवडा आहे. गव्हाचे पीठ खरेदी करण्यासाठी लोकांच्या रांगा लागलेल्या आहेत. त्यात चेंगराचेंगरी होऊन कित्येक जण प्राणास मुकले आहेत. यामुळे गुन्हेगारी वाढली आहे. चोरी तसेच घरफोडीच्या घटना वाढलेल्या आहेत. आता



परिस्थिती हाताबाहेर जात आहे. त्यामुळे पाकिस्तान आता दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. गेली कित्येक वर्षे पाकिस्तानात राजकीय अस्थिरता आहे. याशिवाय चीनकडून तसेच इतर अनेक राष्ट्राकडून घेतलेल्या कर्जाचे डोंगर आहेत. ते कसे फेडणार? तसेच वीजनिर्मितीचा सुद्धा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. एक देश चालविणे इतके सोपे नाही. हे आता पाकिस्तानातील जनतेला कळून चुकले आहे.

शेती, पाणीपुरवठा, बेरोजगारी तसेच आत्मनिर्भरता संरक्षण या सर्वच आघाड्यावर सारखीच प्रगती करावी लागते. पाकिस्तानची हीच मोठी चूक आहे. त्यांनी विदेशी कर्जाचा मोठा डोंगर उभा केला तसेच देशात सर्वच आघाड्यावर पुरेसे लक्ष दिले नाही. त्याचा परिणाम आज पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**



# - संतविचार -

**डॉ. देविदास गुरव, सोलापूर**


# 'ते सत्क्रियाचि आचरावी ।'

**'याचि परी पाहाता । तुज उचित होय आता। स्वकर्म हे। कर्मफळी आस न करावी । आणि कुकर्मी संगती न व्हावी ते सत्क्रियाचि आचरावी । हेतूविण।।**

ज्ञानेश्वर माऊलींची कर्माविषयीची रचना नितांत सुंदर आहे. ते म्हणतात, 'हे मानवा! तू योगयुक्त होऊन फलाशा न करता एकाग्रतेने तुझे कर्म कर. उचित अनुचित काय याचा विचार कर. कुकर्माच्या संगतीच्या आधीन न होता सत्कर्माचे आचरण कर' शेकडो वर्षापूर्वी माऊलीने सागिंतलेला हा सद्विचार महत्वाचा आहे. जीवाकडून कर्म घडणारच. काम्य व निषिद्ध कर्म टाळून 'स्वधर्म कर्म' करता येणारच नाही का? मग हा दोष कुणाचा? हा प्रश्न महत्वाचा आहे. अगदी क्षुल्लक कारणावरून 'तू तू-मै मै' आपण करतो. सर्व सामान्य जीवाचा विचार न करता त्यांच्या मरणावर अधर्माचरणाचा व्यापार जोरात चालवतो. कारण वृत्ती दूषित झाली आहे. मानवता माणुसकी व परोपकारता यापेक्षा पैसा मौल्यवान झाला आहे. म्हणजेच मनाचा हव्यास, मनाची वासना वाढली आहे. प्रवृत्तीतील हे दोष संत हे परखडपणे सांगतात. नाथ माऊली म्हणतात त्याप्रमाणे-

**'कर्मी ब्रह्मी दोष नाही, दोषचि वृत्तीच्या ठायी'**

कर्माच्या दोषामागे दूषित वृत्ती कारणीभूत होते. हे टाळण्याकरिता रजोगुणी व तमोगुणी वासनांचा प्रभाव नियंत्रित करता आला पाहिजे. ते संतप्रणित विचार आत्मसात केल्याने जमू शकते. ते सांगतात त्याप्रमाणे कर्म करूनही ती न केल्यासारखी वाटली पाहिजे म्हणजेच त्याचे कर्तेपण स्वतःकडे न घेता ते भगवंतास समर्पित करावे.



**'कर्म म्हणिजे ते निवृत्त । जे आशापाश फळरहित ।। का क्रिया जे उपकारार्थ । सात्विक निश्चित ते कर्म ।।**

खरा भक्त, सज्जन व सत्पुरूषांचे आचरण हे असे असते. सर्वसामान्य जनांनी ज्ञान, कर्म आणि भक्ती मार्गाचे निष्ठेने अनुसरण करावे. हेच संतांच्या वाणींचे मर्म व सांगणे आहे. अंतःकरणातील कर्तृत्वाचा अहंकार आणि फलासक्ती याचा परिपूर्ण लोप झाला पाहिजे कारण ते अशाश्वत आहे. याकरिता निरंतर संतविचार व संतवचन याचे स्मरण अनुकरण तर पहिजेच शिवाय संत सहवास व गुरूकृपाही तितकीच महत्त्वाची आहे.

आजकालची परिस्थिती विपरीत आहे. अवतीभोवतीचे वातावरण गढूळ झाले आहे. मन विमनस्क झाले आहे. अशावेळी संतविचार तारक ठरतात. संतांचे बोध मार्गदर्शक ठरतात, आधार वाटतात.कारण संताचे उद्‌बोधन, सद्विचार व तत्व संजीवक असतात. त्यांचे अमृतविचार कालबाह्य होत नाहीत. तेव्हा प्रतिकूल स्थितीत जर त्यांच्या विचारांचे, स्मरण व आध्यात्मिक वाणींचे श्रवण केले तर तणावाच्या भाराखाली दडपलेल्या व खचलेल्या मनाला थोडा तरी दिलासा मिळतो. संत विचारांचे स्मरण म्हणजे संतांचा सहवासच. त्यांचे सात्विक विचार अंतःकरणावर प्रभावकारक असतात. हे मात्र खरे. परंतु, त्याकरिता मनुष्याला आपल्या विधायक कर्मावर निष्ठा आणि विश्वास हवा नि त्यानुसार आचरण हवे. मोहमायेच्या जंजाळात मनाला भ्रमित होऊ न देता कर्माप्रति अढळ राहिले पाहिजे. संतांचे आचरण, अभंग व वाणी आपल्याला हेच दर्शवत असते.

**'असावे स्वधर्मे, जाणावे ते वर्म, जेणे कर्म ब्रह्मात वसे'।।**

भौतिक जीवनातही परमार्थाचे कार्य साधता येते. ज्याने त्याने आपल्या स्वधर्मानुसार सत्कर्म करावे. विरूद्ध परिस्थितीतही कर्माशी एकनिष्ठ कसे राहावे हे संत बहेणाबाई स्पष्ट करतात. संत तुकोबारायांनी शुद्ध व्यवहाराला श्रेष्ठ धन मानले आहे. **'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास भोगील वेच करी । उत्तमची गती तो एक पावेल, उत्तम भोगील जीव खाणी।**


भगवंतास भक्तीने साध्य करायचे असल्यास सद्विचार, सद्वर्तन व सत्कर्म हे गुणही अंतरंगी असावे. वर्तनाचे नैतिक तत्व संत तुकोबाराय सहज आपल्यापुढे ठेवतात. अध्यात्माचे मर्म व परमार्थाची साधना जाणून घेताना आपले मन निर्मळ व स्वच्छ असावे, भेदाभेद, मत्सर, द्वेष बाजूला सारून सतत सत्याचा व समत्वाचा अंगीकार करा. सुख-दुःख समजून घ्या. कोणाला दुखावू नका. त्रास होईल असे वागू नका. सर्वांभूती परमेश्वर मानून आपले नित्य कर्म करा. हेच सर्वेश्वराच्या भक्तीचे रहस्य आहे. संतांच्या वाणीतून भक्तीचे अमृत प्राशन कसे करावे याचेही आकलन होते. संतांचे आचरण, अभंग व वाणी आपल्याला हेच दर्शवत असते. आपले आचरण असेच असावे. योग्य प्रयत्न, कर्मनिष्ठा, श्रध्दा, विश्वास व धैर्य यामुळे नक्कीच आपले मनोबल वृध्दिंगत होईल. संतवाणीचे व संत विचारांचे हेच तर खरे मर्म आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## सोलापूरचे उद्योजक रवींद्र गोयल समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर** : बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी संघाच्या वतीने पुणे येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय मेळाव्यामध्ये सोलापूरचे उद्योजक व समाजसेवक रवींद्र गोयल यांना सन २०२३ चा राज्यस्तरीय आदर्श समाज भूषण हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहामध्ये लक्ष्मणराव लटपटे, भटके विमुक्त मोर्चा महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, आ. तोताराम कायंदे, संघाच्या अध्यक्षा लक्ष्मी गरकळ यांच्या उपस्थितीत गोयल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उद्योजक, माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण संघटना, राष्ट्रीय स्तरावर इंटरनॅशनल ह्युमन राईट असोसिएशन , सोलापूर पोलीस आयुक्तालय शांतता कमिटी सदस्य, सद्गुरु उद्दिष्ट सामाजिक संस्था अशा विविध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गेली दहा वर्षे ते समाजसेवेत आहेत. गोरगरीब व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात . याआधी २०२२ मध्ये त्यांना वसंत सोशल फाउंडेशन यांच्या क्रांतिवीर वसंतराव नाईक या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.



## यशवंत सेनेच्या सोलापूर जिल्हा प्रमुखपदी पिंटू बंडगर यांची निवड

**नाझरे** : अनकढाळ तालुका सांगोला येथील माजी सरपंच पिंटू बंडगर यांची यशवंत सेनेच्या सोलापूर जिल्हा प्रमुख पदी पंढरपूर येथील होळकर वाड्यात निवड करण्यात आली. राज्याचे सरसेनापती माधवराव गडदे व पश्चिम महाराष्ट्र प्रमुख राजेश तांबवे यांच्या शुभहस्ते बंडगर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. समाजाच्या न्याय हक्कासाठी कटिबद्ध राहून यशवंत सेनेचा प्रचार व प्रसारासाठी आपण कार्यरत राहून यशवंत सेनेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय बापूसाहेब कोकरे यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण जबाबदारीने काम करू असे सत्कारमूर्ती पिंटू बंडगर यांनी सांगितले. यावेळी सरपंच विष्णू देशमुख युवा नेते उल्हास दादा धायगुडे, बाळासाहेब बंडगर, नारायण गावडे, धनंजय धबधबे व समाज बांधव उपस्थित होते.

## जवाहर विद्यालयाचा आदर्श विद्यार्थी म्हणून निशान शेखची निवड



**सोलापूर** : जुळे सोलापूर येथील जवाहर विद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा व विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये सर्वच उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे आदर्श विद्यार्थी म्हणून जिशान शेख याची निवड करून गोल्ड मेडल देवून सन्मान करण्यात आला. जवाहर विद्यालयाच्या वतीने दरवर्षी विविध स्पर्धा घेण्यात येतात. यामध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनी इयता मोठा गटासाठी ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती, रोजची उपस्थिती, शालेय उपक्रमातील सहभाग. वर्ग काम, दररोजचा घरचा अभ्यास, व्यवस्थित नीटनेटकेपणा, स्वच्छतेच्या सवयी, शाळेतील विद्यार्थ्यांसोबतची वर्तणूक, मदतीची भावना, घरी बनवण्यासाठी दिलेले उपक्रम असे उपक्रम घेण्यात आले. या सर्व निकषांवरून आदर्श विद्यार्थी म्हणून जिशान शेख तर आदर्श विद्यार्थिनी म्हणून जारा बिराजदार या दोघांची निवड करण्यात आली. यावेळी शिक्षिका शिल्पा यावगल, गायत्री कानडे यांनी दोघांचा मेडल देउन सन्मान केला.

## माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्यावतीने वाढेगांव माणनदीची स्वच्छता

**सांगोला** : माणगंगा भ्रमणसेवा संस्था व निरंकारी मंडळ शाखा सांगोला यांच्यावतीने शनिवारी माणगंगा नदीची स्वच्छता करण्यात आली. वाढेगाव को. प. बंधारा ते त्रिवेणी संगम महादेव मंदिरापर्यंत १ किमी नदी स्वच्छ केली. नदीपात्रात असणार्या चिलार बाभळी, उपद्रवी वनस्पती, नदीतील कचरा जाळून टाकण्यात आला. या अभियानात दोन्ही संस्थेचे सदस्य, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या स्वच्छता अभियानानंतर सर्वांसाठी त्रिवेणी संगम येथे भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या अभियानास सहकार्य करणाऱ्याचा सत्कार करुन आभार मानण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी माणगंगा संस्थेचे अध्यक्ष वैजीनाथ घोंगडे, संत निरंकारी मंडळ शाखा सांगोलाचे प्रमुख रावसाहेब सरगर, माजी नगरसेवक गजानन बनकर, संजय दिघे, राहूल ऐवले, संजय बंदरे, रामचंद्र महाकाळ, दगडू जाधव, सिद्धेश्वर मेटकरी, दत्ता कुंभार, सुरेश पाटिल, राहुल इतापे उपस्थित होते.

# संत साहित्याने संशयाच्या गाठी दूर केल्या : बोधले महाराज

सुराज्य/सांगोला



संत साहित्य हे आतापर्यंत समाजाला दिशा देण्यासाठी मार्गदर्शन ठरीत आहे. संत साहित्याने समाजाला बदलले. शरीरात होणारा बदल नको, मनात बदल झाला पाहिजे, त्यातून समाजमनात बदल होत असतो. समाजमनातील लोकांना विकास करायचा असेल तर संत साहित्याचा अभ्यास केला पाहिजे. संत साहित्याने जगातील पाप म्हणजे संशयाच्या गाठी दूर केल्या, समाजातील स्पृश्य अस्पृश्यचा विटाळ दूर करण्याचे महान कार्य फक्त संत साहित्याने केले. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत जनाबाई, संत चांगदेव, संत चोखोबा यांनी आपल्या वागण्यातून आणि आधुनिक काळातील महापुरुषांनी संत साहित्याचा विचार समाजात रुजविला. त्यामुळे संत साहित्य हे आधुनिक काळातील समाजासाठी प्रेरणा देत आहे. आपले जगणे हेच संत साहित्याचा अविभाज्य घटक बनले आहे. म्हणून संत साहित्याचा अभ्यास केला पाहिजे, संत साहित्याला विसरून चालणार नाही, असे मत ह.भ. प. जयवंत महाराज बोधले यांनी व्यक्त केले. सांगोला येथे सुरु असलेल्या राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमात संत साहित्य आणि समाज परिवर्तन या परीसंवादात व्यक्त केले.या वेळी कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ. प. श्यामसुंदर सोन्नर महाराज, ह. भ. प. देवदत्त परुळेकर महाराज, ज्येष्ठ पत्रकार सचिन परब, आणि संवादक ॲड. गजानन भाकरे उपस्थित होते.

यावेळी श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी आपले विचार व्यक्त करताना संत साहित्य आणि आजच्या आधुनिक काळातील संताचे विचार किती मार्गदर्शन केले. मराठी भाषा हि संत साहित्यामुळे किती समृद्ध झाली आहे. आणि त्या भाषेत किती ताकद आहे हे विविध मुद्याद्वारे पटवून दिले. तर ह.भ.प.देवदत्त परुळेकर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत समाजातील प्रगती संत साहित्यातून कशी समृद्ध होत गेली हे पटवून दिले. तर साहित्य संमेलन व समाज परिवर्तन यामध्ये प्रसिध्द पत्रकार सचिन परब यांनी आपल्या मनोगतातून जिथे संत नामाचा विचार होतो, तिथे समाजाची प्रगती शक्य आहे. संताच्या विचाराने हि भूमी घडली आहे. खरा धर्म म्हणजे सेवाधर्म होय, सेवाधर्माचे मूळ हे संत साहित्यात आढळते. संत परंपरा महान आहे. सामाजिक परिवर्तन हे संत साहित्यातुन होत आहे. आधुनिक समाजसुधारकांनी सुध्दा संत साहित्यातून सामाजिक परिवर्तन शक्य आहे, हे ओळखून उत्कृष्ट सामाजिक कार्य केले असल्याचा सुर या परीसंवादातून व्यक्त केला.

### कथाकथनाला दाद


साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाच्या सत्रात कथाकथन पार पडले. प्रसिध्द कथाकार आप्पासाहेब खोत यांनी मरणादारी हि कौटुंबिक कथा सादर करुन उपस्थितांना भावनिक केले. तर ज्योतिराम फडतरे यांनी शाळा तपासणीहि विनोदी कथा सादर करुन उपस्थितांची दाद मिळवली.

### डॉ. कृष्णा इंगोले यांची मुलाखत

यावेळी सांगोलाचे सुपुत्र आणि लेखक डॉ. कृष्णा इंगोले यांची मुलाखत घेण्यात आली. आपल्या प्रकट मुलाखतीतून त्यांनी आपण लेखक कसा घडलो, हे सांगितले. सांगोलासारख्या दुष्काळी भागात माणदेशी साहित्य कसे लिहीत गेलो, हे उलगुढून सांगितले. दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमास सांगोला शहर आणि तालुक्यातील साहित्यप्रेमींनी आवर्जून उपस्थिती दर्शविली.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते शेतकरी वारसा धनादेशाचे वाटप

सुराज्य/सोलापूर



गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत मृत खातेदारांच्या सात वारसांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आज येथे प्रातिनिधीक स्वरूपात प्रत्येकी दोन लाख रूपयांच्या मदतीचे धनादेश वाटप करण्यात आले.

यावेळी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे आदि उपस्थित होते.

अंजली ज्ञानेश्वर साठे (दारफळ बी.बी, ता. उ. सोलापूर), श्रीदेवी लालचंद माळी व पुष्पा विश्वनाथ स्वामी (दर्गनहळळी, ता. द. सोलापूर), आशाबाई वसंत माळी (आलेगाव, ता. द. सोलापूर), मदिना नरोकीन दाखने (शिरवळ, ता. अक्कलकोट), भाग्यश्री श्रीशैल कापसे (जेऊर, ता. अक्कलकोट), धुंडावा बसवराज मद्री (करजगी, ता. अक्कलकोट) अशी मदत मिळालेल्या शेतकऱ्यांची नावे आहेत.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये सोलापूर जिल्ह्यातून २६३ प्रस्ताव प्राप्त झाले होते व सर्व प्रस्ताव कंपनीकडे दाखल केले होते.

त्यातील १६० प्रस्ताव मंजूर झाले. ५७ प्रस्तावांवर कार्यवाही सुरू असून, ४६ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत. याअंतर्गत ३ कोटी १७ लाख रूपये विमा वाटप करण्यात आले.

तसेच, ७ एप्रिल ते २२ ऑगस्ट २०२२ या खंडित कालावधीमधील १०५ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ८५ प्रस्ताव आयुक्तालयास सादर करण्यात आले. पैकी ६७ प्रस्ताव मंजूर करण्यात आले. ३८ प्रस्तावांवर कार्यवाही सुरू आहे.

याअंतर्गत १ कोटी ३४ लाख रूपये मदत वाटप करण्यात आली आहे. आज प्रातिनिधीक स्वरूपात धनादेश वितरण कररण्यात आले असून, उर्वरित वारसांना देण्यात येणारी मदत आरटीजीएसद्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

# पंढरपुरात कोयत्याने पुन्हा वार; दोघे गंभीर जखमी

सुराज्य/पंढरपूर

माझ्या जागेवर बांगड्याचा गाडा का लावला म्हणून विचाराणा केल्यामुळे दोघां जणांवर पाच जणांनी थेट कोयत्याने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी पहाटे घडली.

दरम्यान या घटनेमधील संशयित आरोपीने गेल्या महिन्यात भर रस्त्यात एकावर कोयत्याने हल्ला केला होता. मात्र या प्रकरणात त्याच्या विरोधात पोलिसांनी कडक कारवाई न केल्यामुळे सदर आरोपीचे धाडस वाढल्याने सदर घटना घडली. पोलिसांनी त्या आरोपीवर कडक कारवाई केली असती तर पंढरपूरात पुन्हा कोयते चालले नसते.

या हल्ल्यात निखिल राजेंद्र कोताळकर व सूरज विजय कोताळकर हे चुलत भाऊ गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी शुभम लखेरी, दिनेश गोमासे, कृष्णा लखेरी व अन्य दोन अनोळखी तरूण अशा पाच जणांवर जीव मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जखमी निखिल कोताळकर याचा संत नामदेव पायरी येथे बांगड्याचा गाडा असून त्याच्या जवळच कृष्णा लखेरी देखील आपला गाडा लावत होता. शुक्रवार ७ रोजी कृष्णाने आपला गाडा निखिल कोताळकर ज्या ठिकाणी गाडा लावत होता तेथे उभा केला. यावरून निखिल याने त्यास रात्री अकरा वाजता माझ्या जागेवर गाडा का लावला अशी विचारणा केली. यावरून दोघांमध्ये वादावादी सुरू असताना दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी हे भांडण सोडविले.

दरम्यान निखिल कोताळकर याला पहाटे तीन वाजता सासुरवाडीला जायचे असल्याने पहाटे दोन वाजता तो चुलत भाऊ सूरज कोताळकर याच्याकडे गेला होता. तांबडा मारूती नजिक एच.पी.दोशी दुकान समोर हे दोघे थांबले असता अचानक शुभम लखेरी, कृष्णा लखेरी, दिनेश गोमासे व दोन अनोळखी तरूण चारचाकीमधून आले. त्यांच्या हातात कोयते व लोखंडी सळया होत्या. शुभम, कृष्णा व दिनेश याने निखिल याला आता तुला जिवंत ठेवत नाही असे म्हणून त्याच्या डोक्यात, पाठीवर, कंबरेवर कोयत्याने वार केले. तसेच सूरज याच्या हातावर, पोटावर देखील कोयत्याने व सळईने हल्ला केला. या दोघांचा आवाज ऐकून सूरज याचा भाऊ श्रीकांत कोताळकर तेथे धावत आला असता वरील पाच जणांनी तेथून पळ काढला. या हल्ल्यात निखिल व सूरज दोघे गंभीर जखमी असून त्यांच्यावर शहरातील खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.



# दलित साहित्याने सामाजिक जाणीव निर्माण केल्या : प्रा.डॉ. तुपेरे

सुराज्य/सोलापूर

१९६० नंतर मराठी साहित्य प्रांतात ग्रामीण साहित्य ,दलित साहित्य, स्त्री वादी साहित्य, आदिवासी साहित्य असे एक ना अनेकाविध प्रवाह निर्माण झाले . ते प्रवाह नव्हते तर . एक प्रकारची क्रांती होती . यात दलित साहित्याची चळवळ ही अतिशय महत्त्वाची आहे . लेखकाला सामाजिक जाणीवा निर्माण करून देण्याचे भान दलित साहित्यांनी दिले . शाहू फुले आंबेडकर यांचा विचार घेऊन अलीकडे शेतकरी कामगार वर्गातील घटक लिहू लागला आहे .शोषितांचा आवाज पुढे येऊ लागला असल्याचे वास्तव प्रख्यात साहित्यिकप्रा . डॉ . सारी पुत्र तुपेरे यांनी व्यक्त केले.

अंकुर साहित्य संघ सोलापूरच्या वतीने देण्यात येणाऱ्याराज्यस्तरीय साहित्य व राज्यस्तरीय समाजसेवक पुरस्काराचे वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते . अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षा प्रा . डॉ . श्रुतीश्री वडगबाळकर या होत्या . यावेळी व्यासपीठावरदलितमित्र आप्पासाहेब जाधव गुरुजी (पुणे ) केंद्रीय उपाध्यक्ष भरत कुमार मोरे जिल्हाध्यक्ष नागनाथ गायकवाड , रिपाई प्रदेशाध्यक्ष सुबोध कालिदास चवडेकर . विकास कस्तुरे यांची उपस्थिती होती .

यावेळी कवी नागनाथ गायकवाड साहित्य गौरव पुरस्कारानेकवी प्रकाश जडे (मंगळवेढा) प्रमोद लांडगे(सोलापूर) कवयित्री प्रा. अंजना गायकवाड, उदगीर येथील अंबादास केदार डॉ. खंडेराव शिंदे (कोल्हापूर) पोपट श्रीराम काळे (पुणे) यांना गौरवण्यात आले तर दलितमित्र स्व. सौदागर मोरे समाजभूषण पुरस्काराने उस्मान शेख, शुंभागी कलकेरी, आंनदराव गायकवाड या तीन सामाजिक कार्यकर्त्यांनागौरव करण्यात आला .रोख रक्कम गौरव चिन्ह प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते . प्रारंभी भरतकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . अंजना गायकवाड यांनी केले . प्रारंभी कवी मारुती कटक धोंड .यांच्या अध्यक्षतेखाली व माधव पवार ,वंदना कुलकर्णी, राजेंद्र भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत कवी संमेलन घेण्यात आले.

## जागेच्या वादातून लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर** : जागेच्या वादातून दोन जणांनी मिळून लोखंडी पाईप व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्यामुळे तरूण जखमी झाला आहे. ऋतिक देवेंद्र गोने (वय २२, रा. भद्रावती पेठ) असे जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

# गोळ्या घेतल्याने इसम रुग्णालयात

**सोलापूर** : अज्ञात कारणातून इसमाने राहत्या घरात जादा प्रमाणात गोळ्या घेतल्याने त्यांना त्रास होऊ लागला. यामुळे संजय शशिकांत पोतदार (वय-४४, रा. आदित्य नगर,विजापूर रोड) यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

**धडकेत दुचाकीस्वार जखमी**

पेट्रोल भरून पंपातून जात असताना पाठीमागून येणार्या दुसर्या दुचाकीने धडक दिल्याने श्रीनिवास अंजय्या श्रीरामोज ( वय ४०, रा. जुना विडी घरकुल) हे जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली.

**पाईपने मारहाण केल्याने इसम जखमी**

गैरसमजुतीतून चार जणांनी मिळून इसमाला गॅसच्या पाईपने मारहाण केल्यामुळे इसम जखमी झाला आहे. शंकर राम असादे (वय-४०,रा. अलकुंटे चौक) असे जखमी झालेल्या इसमाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

# सम्यक विचार मंचतर्फे मिलिंद व्याख्यानमाला

सुराज्य/सोलापूर

सम्यक विचार मंचच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिलिंद व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.मंगळवार दि.११ एप्रिल ते १४ एप्रिलपर्यंत सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात ही बौद्धिक मेजवानी सोलापूरकरांना मिळणार आहे.

या व्याख्यानमालेचे उद्घाटन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९६ व्या जयंती दिनी मंगळवार दि. ११ रोजी सायंकाळी ६:३० वा. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते होणार असून जेष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना राज्यस्तरीय सम्यक जीवन गौरव पुरस्काराने सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते गौरवण्यात येणार आहे. रुपये ११०००/- रोख, सन्मान चिन्ह व शाल असे पुरस्काराचे स्वरुप आहे. आंबेडकरी चळवळीचे भवितव्य या विषयावर या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर (मुंबई) हे गुंफणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. गौतम कांबळे हे अध्यक्षस्थान भूषवणार असून प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे हे उपस्थित राहणार आहेत.



**डॉ.मुणगेकर यांना सम्यक जीवन गौरव पुरस्कार**

दुसरे पुष्प बुधवार दि.१२ एप्रिल रोजी प्रा. डॉ. संबोधी देशपांडे (जळगांव) ह्या स्त्री मुक्ती चळवळ-तथागत गौतम बुध्द ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर गुंफणार असून अध्यक्षस्थानी पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे या राहणार असून प्रा. डॉ. विजया महाजन ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तिसरे पुष्प गुरुवार दि.१३ एप्रिल रोजी प्रा.जावेद पाशा कुरेशी (चंद्रपूर) हे भारतीय संविधान: तरतुदी, अंमलबजावणी व सध्यस्थिती या विषयावर गुंफणार असून अध्यक्षस्थानी जेष्ठ विधीज्ञ ॲड. संजीव सदाफुले हे राहणार आहेत. जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. व्याख्यानमालेचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३२ व्या जयंतीदिनी शुक्रवार दि.१४ एप्रिल रोजी पूज्य भन्ते करुणानंद थेरो (छत्रपती संभाजी नगर) यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आदर्श बौध्द समाज या विषयावरील धम्मदेसनने होणार असून प्रमुख उपस्थिती सार्व. बांधकाम विभागाचे उपअभियंता श्रीकांत गायकवाड हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांची उपस्थिती असेल. अशी माहिती सम्यक विचार मंचचे वतीने अध्यक्ष चंद्रकांत कोळेकर व सचिव सुधीर चंदनशिवे, कार्याध्यक्ष रमेश सुरवसे, कोषाध्यक्ष मनीष सुरवसे आदींनी दिली.

**मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा**

ई-निविदा सूचना जा.क्रं.कार्या-२/बांध./५९१/२०२२-२३ दि.०६/०४/२०२३

नगरपरिषद मंगळवेढा यांचेकडून खालील कामांकरिता बी-१ नमुन्यामध्ये दोन लिफाफा पद्धतीने (ई-निविदा पद्धतीने) अशा कामांचा दिर्घ अनुभव असलेल्या महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामांची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमूना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दि.१०/०४/२०२३ पासून उपलब्ध आहे. बयाणा रक्कम व कोरी टेंडर फॉर्म फी नेट बँकिंग पद्धतीने स्विकारली जाईल.

| अ.नं. | कामांचे नाव | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षित ठेव | कामांचा कालावधी | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|
| वैशिष्ट्यपूर्ण योजना सन २०२२-२३ | | | | | | |
| १ | कल्याणप्रभू मंदिर ते नागणेवाडी दादा डोंगरे घरापर्यंत रस्ता व भिवाजी साळुंखे घरापासून तुकाराम सावंजी घरासमोरील गटार बांधणे. | २३९९१८७ | २३९९१ | ४७९८२ | ६ महिने | १५०० |
| न.पा. फंड सन २०२२-२३ | | | | | | |
| १ | खंडोबा मंदिर (मारूती वाकडे घरापासून) ते परमेश्वर पाटील यांच्या घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची ४ DI पाईपलाईन टाकणे | ३९५२०० | ३९५२ | ७९०४ | ३ महिने | ५०० |

| ई-निविदा दस्तऐवज करण्याचा तपशील | दस्तऐवज लोड करण्याचा कालावधी |
|---|---|
| ई-निविदा दस्तऐवज लोड प्रारंभ दिनांक | दिनांक.१०/०४/२०२३ सकाळी ११.०० पासून |
| ई-निविदा दस्तऐवज लोड समाप्त दिनांक | दिनांक.२३/०४/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरूवात दिनांक | दिनांक.१०/०४/२०२३ सकाळी ११.०० पासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक.२३/०४/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक.२४/०४/२०२३ सकाळी ११.०० पासून |

शर्ती व अटी :-

१)प्राप्त निविदापैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच काहीही वाद झाल्यास सर्वाधिकार मुख्याधिकारी यांना असतील. सबब कारणे दिली जाणार नाहीत.

२) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना बयाणा रक्कम व सुरक्षित रक्कम सूट दिली जाणार नाही.

३) इतर सर्व अटी व शर्ती ई-निविदा पत्रामध्ये (फॉर्मवर) देण्यात आल्या आहेत.

४) प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून सदर निविदा काढण्यात येत आहे.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
मंगळवेढा नगरपरिषद

# जिल्ह्यातील 'गुड मॉर्निंग' पथके गायब

✔ सुराज्य/सोलापूर

**हागणदारीमुक्त अभियानासाठी शासनस्तरावर जनजागृतीसह विविध प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले. यासाठी 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत 'गुड मॉर्निंग' पथके तयार करण्यात आली होती. हागणदारी मुक्त जिल्हा झाल्याची घोषणा ५ वर्षांपूर्वी जिल्ह्यात करण्यात आली. त्यासाठीचे फलकही गावोगावी लावण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात हागणदारी मुक्त अभियान यशस्वी झाल्याचे ग्रामीण भागात कुठेही दिसून येत नाही. या महत्त्वाच्या अभियानाचा प्रशासनाला विसर पडला असून प्रशासन नवीन-नवीन उपक्रम राबविण्याचा पाठीमागे लागले आहे. त्यामुळे पुढचे पाठ, मागचे सपाट अशा उपक्रमाचे दयनीय अवस्था झाल्याचे जिल्हाभर दिसत आहे.**

## हागणदारीमुक्त अभियानाचे तीन तेरा

हागणदारीमुक्त जिल्हा परंतु प्रशासनाच्या उदासीन धोरण आणि लोकसहभागा अभावी गुड मॉर्निंग पथके केवळ नावालाच राहिले आहे. मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फत ग्रामीण भागात कर्मचाऱ्यांच्या मदतीने 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत गुड मॉर्निंग पथकाची निर्मिती करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाचे सहकार्य नसल्याने गावकऱ्यांमध्ये तेढ निर्माण होत असल्याचे चित्र जिल्हाभरात दिसत आहे. सुरुवातीला ज्या स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून सकाळी उघड्यावर शौचास जाणाऱ्यांच्या मनात भितीचे वातावरण पसरले होते. ती भीती आता लोकांमध्ये राहिलेली नाही. त्याला कारण प्रशासनाचे दुर्लक्ष. शासनाने याकरिता जनजागृती म्हणून कोट्यवधी रुपये खर्च केले होते परंतु त्यानंतर त्या या अभियानाकडे लक्ष न घेता दुसरींच उपक्रम हाती घेण्यात आले आणि मुख्य अभियान बाजूला पडले. त्यामुळे आज ग्रामस्थ बिनधास्तपणे उघड्यावर शौचास बसत असल्याचे चित्र जिल्हाभरात दिसत आहे.



गावात प्रवेश करताना किंवा गावातून बाहेर पडताना दुर्गंधी येते. तेंव्हा नाकाला रुमाल बांधण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. पूर्वी पथकाची भिती निर्माण झाल्याने नागरिक शौचालयाचा वापर करीत होते. परंतु आता तशा प्रकारची भिती नागरिकांच्या मनात राहिलेली नाही. त्यामुळे उघड्यावर शौचास जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पूर्वीप्रमाणेच गुड मॉर्निंग पथकाकडून अशा व्यक्तींवर कारवाई सुरु करावी, अशी मागणी नागरिकांतून पुढे आलेली आहे. दरम्यान उघड्यावर शौचालय जाणाऱ्यांची संख्या वाढण्याचे कारणे अनेक आहेत. त्यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पाण्याची देखील समस्या आहे. अनेक गावांमध्ये पाणी नसल्यामुळे शौचालय बांधून देखील नागरिकांना उघड्यावर जावे लागत आहे.

### स्वच्छता विभागाची भेट नावालाच

स्वच्छता विभागाकडून गावात वेळोवेळी भेटी देऊन स्वच्छता मोहीम राबविणे अपेक्षित आहे. परंतु स्वच्छता विभागाची भेट कागदोपत्री दाखविली जाते. त्यामुळे या मोहिमेचा कारभार केवळ कार्यालयात बसूनच चालतो का असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रामस्थ उघड्यावर शौचास जात आहेत. त्यामुळे घाणीचे साम्राज्य तर दिसून येते. परंतु अनेक नागरिकांना लहान मुलांना वयस्कर व्यक्तींना छोट्या मोठ्या आजाराला बळी पडावे लागत आहे. अजून वेळ गेलेली नाही. प्रशासनाने त्याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी जिल्हाभरात होत आहे.



## निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे बचेरी गावचे पालकमंत्र्यांना निवेदन

✔ **सुराज्य/पिलीव :** बचेरी तालुका माळशिरस येथील ग्रामस्थ यांनी निरा देवघर योजनेत बचेरी गाव सामाविष्ट करण्यात यावे यासाठी पुढील सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय एकमुखाने घेतला आहे तसा ग्रामपंचायतीने ठराव केला आहे व दोन हजार सुज्ञ नागरीकांनी जोपर्यंत योजनेत बचेरी गावाचे नाव सामाविष्ट करण्यात येत नाही तोपर्यंत आम्ही पुढील कोणत्याच निवडणुकीत मतदान करणार नसल्याचे ईश्वर साक्षी शपथ घेऊन मान्य केले आहे. पाणी मिळावे यासाठी पाणी संघर्ष समितीने टोकाचा संघर्ष सुरू केला आहे. पाणी संघर्ष समितीमार्फत निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा जो ठराव आहे त्याचे निवेदन शासन स्तरावर तसेच लोकप्रतिनिधी आमदार खासदार मंत्री यांना देण्याचे काम प्रगतिपथावर सुरू आहे. त्यानुसार शनिवारी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन देण्यात आले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संपुर्ण निवेदन वाचले व वरीष्ठ स्तरावर मी प्रयत्न करतो, असे सांगितले. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार बचेरीचे ग्रामस्थ सदाशिव शिंदे, मच्छिंद्र थिटे, बिरा शिंदे, गणेश देशमुख उपस्थित होते.

## माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे यांचा वाढदिनी तुलाभार

✔ सुराज्य/अक्कलकोट

सोलापूर जिल्हा वीरशैव लिंगायत माळी समाजसेवा मंडळाच्यावतीने दि. ८ एप्रिल रोजी जुळे सोलापूर येथे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमाने संपन्न झाला.

कार्यक्रम, आर्य चाणक्य नगरमध्ये घेण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश हसापुरे (कार्याध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटी), चेतनभाऊ नरोटे (शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी), माजी नगरसेवक जयकुमार माने, आनंद तानवडे (माजी पक्षनेता जिल्हा परिषद,सोलापूर), सिध्दार्थ गायकवाड (माजी सभापती पंचायत समिती, अक्कलकोट), अमोल जोशी (सचिव इंडियन मॉडेल स्कूल), प्रथमेश म्हेत्रे (माजी सभापती मार्केट कमिटी, दुधनी), गुरुसिध्द म्हेत्रे (कार्याध्यक्ष माळी समाज संघटना), बसवराज बालीकिले (अध्यक्ष बसवकल्याण, माळी समाज संघटना), सुरेखाताई काटगाव (सभापती पंचायत समिती, अक्कलकोट), माजी नगरसेवक मधुकर आठवले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सूत्रसंचालन सहसचिव शंकर अजनाळकर यांनी तर प्रास्ताविक उपाध्यक्ष- सिध्दाराम कोरे यांनी केले. कार्यक्रमात प्रमुख अतिथी यांनी सिध्दाराम म्हेत्रे यांचा गुणगौरव करून अभिष्टचिंतन केले तर जिल्हासंघटना सचिव शशिकांत काळी यांनी, जिल्हा अध्यक्ष व माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा संघटनेच्यावतीने सत्कार केले. नाविन्यपूर्ण उपक्रम, वह्यांचा तुलाभार करण्यात आला. तुलाभार करण्यात आलेल्या वह्या गोरगरीब मुलांना वाटप करण्यात येणार आहे तसेच सत्कारमूर्ती व प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत



सिध्देश्वर ब्लड बँकेच्या संयोजनाने, रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. शिबिरामध्ये ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.कार्यक्रमाचे आभार सहसचिव संदीप फुलारी यांनी केले तर कार्यक्रम यशस्वितेसाठी उपाध्यक्ष सुजित कोरे, खजिनदार सतीश इसापुरे, संचालक नागनाथ म्हेत्रे, सुनील इसापुरे, मारुती तोडकर, हेमंतकुमार माळी, विठ्ठल म्हेत्रे, सिध्दाराम कोरे, गणेश पाटील, शशिकांत चौगुले, संतोष भकरे (अध्यक्ष-राष्ट्रवादी ओबीसी सेल) काशिनाथ जोडमोटे, यशवंत माश्याळ, श्रीशैल नवले, डॉ. संजय फुलारी डॉ. अशोक बोल्डे, उमेश यळसंगी, रवीशंकर बोधले, महेश तागडे, शेखर आडवितोटे, भैरप्पा कारभारी, दिलीप उळागड्डे, अजय आडवितोटे, भीमाशंकर सवळी व श्रीशैल पराणे आदी मान्यवरांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## फोन पेद्वारे फसवणूक

✔ सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने फिर्यादीचा मोबाईल घेऊन परस्पर फोन पे चा पासवर्ड डायल करून त्या आधारे ९८ हजार ४५० रुपये ट्रान्सफर करून आर्थिक फसवणूक केल्याची घटना दि. ७ एप्रिल रोजी पाच वाजण्याच्या सुमारास गाळा नंबर चार सेल हॉल मार्केट यार्ड येथे घडली. याप्रकरणी अमर अर्जुन गाडे (वय-३६, रा. मुपो. सोनारी, ता. परंडा) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



## आंबेडकर जयंतीनिमित्ताने फेंड्स ग्रुपतर्फे रक्तदान शिबीर

✔ **सुराज्य/सोलापूर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्ताने ओन्ली फ्रेंड्स ग्रुपतर्फे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. ३५ रक्तदात्यांनी यात सहभाग नोंदवला. यावेळी राजा सरवदे, मध्यवर्ती अध्यक्ष शिवम सोनकांबळे, सुशील सरवदे, ॲड. राजकुमार म्हात्रे, माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी, रमेश राठी, चेतन नरोटे, पिंटु ढावरे, समर्थ मोटे, अरुण भालेराव, नागेश माने, रवी बनसोडे, समीर शेख, मनीष काळजे, भिमाशंकर टेकाळे, बळी काळे, अमित आजनाळकर, उदय रुपनर, विकी भोसले, मोहसिन तांबोळी, साई कोळी, चंद्रशेखर गायकवाड, सोमनाथ काटकर उपस्थित होते.

## जैन संघटनेच्या राज्य कार्यकारणीवर पाटील



✔ **सुराज्य/सोलापूर** : भारतीय जैन संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारणीवर श्याम पाटील याची निवड करण्यात आली. भारतीय जैन संघटनेचे संस्थापक आदरणीय शांतीलालजी मुथा राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्रजी लुंकड यांच्या आदेशावरून राज्याध्यक्ष नंदकिशोर साकला नाशिक तसेच दीपक चोप्रा यांनी ही निवड केली. यासाठी महिला राज्य उपाध्यक्ष कांचन मला सांगावे व स्मार्ट गर्ल विभागाचे राज्यप्रमुख रत्नाकर महाजन यांनीही शिफारस केली होती. विविध उपक्रमातून त्यांच्या कार्याची चुणूक दाखवल्याबददल त्यांची ही निवड करण्यात आली. त्यांचे विभागीय अध्यक्ष प्रवीणकुमार बलदोटा, सचिव महावीर गांधी विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते, वालचंद पाटील, जिल्हाध्यक्ष देशभूषण वसाळे, जिल्हा सचिव प्रशांत वर्धमाने आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## चिखली परिसरात अवकाळी पावसाची हजेरी

✔ **सुराज्य/चिखली** : मोहोळ तालुक्यातील चिखली परिसराची शनिवार सकाळ पावसाळ्याचा अनुभव देणारी ठरली. शनिवारी रात्रीपासून चिखली परिसरात अवकाळी पावसाने मेघगर्जनेसह दमदार हजेरी लावली. विजांच्या प्रचंड गडगडाटात पावसाने हजेरी लावल्याने सध्या पावसाळा सुरू आहे की उन्हाळा, असा प्रश्न पडला होता.

अवकाळी पावसाची हजेरी आणि विजांचा गडगडाट असल्याने वीजपुरवठा देखील खंडित झाला होता. खंडित झालेल्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या अंगाची लाही लाही झाली. शुक्रवार दुपारपासूनच हालक्याशा पावसाला सुरवात झाली होती.

शनिवारी रात्री आणि सकाळी मात्र या भागात पावसाने चांगलीच हजेरी लावली. शनिवारी सकाळी झालेला दमदार अवकाळी पाऊस आणि दिवसभर ढगाळ वातावरणामुळे उन्हाचा चटका आणि उकाड्याने हैराण झालेल्या चिखलीकरांना दिवस सुखद गेला.

## आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेत राज मेमोरियल इंग्लिश स्कूलचे

✔ सुराज्य/सोलापूर

जुनी मिल कंपाऊंड सुपर मार्केट येथील राज मेमोरियल इंग्लिशचे रंगोत्सव मेलिब्रेशन मुंबई, यांच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रकला व हस्तकला स्पर्धेत राज मेमोरियल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेत शाळेतील पंधरा विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये हस्तक्षर स्पर्धेत सायली संगमेश्वर साखरे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केले आहे. सदर स्पर्धेमधून सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र, चषक, पदक व आकर्षक भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांना



मुख्याध्यापिका पुरस्कार, शाळेला The Highest Parforming School in the World, तसेच चित्रकला शिक्षक, व्यंकटेश ब्याकोड, अदिती मंठाळकर यांना देखील चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष महेश कोटे, डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्राध्यापक विलास बेत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा व सर्व शिक्षक वृंद यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

सदर विद्यार्थ्यांना कला शिक्षक व्यंकटेश ब्याकोड, अदिती मंठाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना कला शिक्षक व्यंकटेश ब्याकोड, अदिती मंठाळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## कामगार संघटनाच्या महासंघाच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक अनिल पल्ली यांची नियुक्ती



✔ **सुराज्य/सोलापूर** : कामगार संघटना महासंघ, सोलापूर जिल्हा कार्यकारिणीची बैठक सिध्देश्वर पेठ येथील लेबर पार्टी कार्यालयात पार पडली. बैठकीचे अध्यक्षस्थानी साथी बशीर अहमद होते. या बैठकीत सन २०२३-२०२४ सालाकरिता महासंघाच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक अनिल दत्तात्रय पल्ली यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी सूचना महासंघाचे उपाध्यक्ष महबूब शेख यांनी केली. सहसचिव कॉ. मुस्ताक शेख यांनी अनुमोदन दिल्यानंतर एकमताने श्री. अनिल पल्ली यांची अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याचे जनरल सेक्रेटरी कॉ. एजाज शेख यांनी सांगीतले.

अनिल पल्ली यांची नियुक्ती झाल्यामुळे कामगार संघटना पदाधिकारी, कार्यकर्ते व कामगार यांच्यामध्ये समाधान झाल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे. या बैठकीत महाराष्ट्र राज्य विद्युत श्रमिक काँग्रेस बारामती झोन अध्यक्ष हाजी जे. एम. शिकलकर, महाराष्ट्र कामगार व कर्मचारी युनियन, जिल्हा परिषद कामगार कर्मचारी युनियन, महाराष्ट्र लेबर युनियन, जनरल कामगार युनियन, घरेलू कामगार युनियन बांधकाम कामगार युनियन, शेतमजूर संघटना, बहुजन कामगार संघटनेचे अशपाक शेख, रेशमा साठे, कॉ. निहाल शेख, कॉ. आर. एम. चितापुरे, ॲड. सुहास जोशी, छगन पंढरे, सत्यव्वा गायकवाड, बाबा बागवान व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते, अशी माहिती कामगार महासंघाचे जनरल सेक्रेटरी कॉ. एजाज शेख यांनी दिली आहे.

## गरम पाणी अंगावर पडल्याने महिला जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

राहत्या घरी गरम पाण्याचे भांडे उचलताना ते पाणी अंगावर पडल्याने महिला जखमी झाली आहे.

पल्लवी निलकंठ रामदुर्ग (वय २८, रा. बेघर हौसिंग सोसायटी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.

उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा ब्रिजधाम वृद्धाश्रमात अभ्यास दौरा

### आई-वडिलांची सेवा केल्यास जीवन सफल : फोफलिया

✔ सुराज्य/सोलापूर :

शिवदारे यांच्या कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली) च्या ६७ विद्यार्थ्यांनी नुकताच ब्रिजधाम वृद्धाश्रमामध्ये आपला शैक्षणिक अभ्यास दौरा केला. यावेळी ब्रिजधाम वृद्धाश्रमाचे संस्थापक ब्रिजमोहन फोफलिया यांनी सदर विद्यार्थ्यांचे स्वागत करून जीवन आचरणाबाबत उपदेशांचे अनेक धडे देऊन आपल्या माता -पित्याची अखेरपर्यंत नि:स्वार्थपणे सेवा करण्याचे आवाहन या विद्यार्थ्यांना केले.

यावेळी फोफलिया पुढे म्हणाले, 'पूर्वी आई-वडिलांच्या मर्जीनुसारच विवाह जमायचे आणि पार पडायचे, लग्नानंतरच वधू-वर एकमेकांचे तोंड पाहायचे आणि ती विवाह अखेरपर्यंत यशस्वी राहायची. आपल्या आई-वडिलांचा, सासू-सासऱ्यांचा आदर करा, घराबाहेर निघताना त्यांचे चरण स्पर्श करून आशीर्वाद घ्या. चांगले संस्कार बाळगा, आई वडील अनेक कष्ट घेऊन हालअपेष्टा सहन करून आपल्याला लहानाचे मोठे करतात, बोट पकडून चालायला शिकवितात आणि आपण मोठे होऊन त्यांच्यासोबत



काय करतोय, लग्नानंतर त्यांची सेवा करण्याऐवजी त्यांना वृद्धाश्रमात आणून सोडतो ही फारच लज्जास्पद बाब आहे. प्रत्येक जण संस्कारी होऊन आई-वडिलांची आपुलकीने सेवा केल्यास भविष्यात अशा वृद्धाश्रमाची आवश्यकताच भासणार नसल्याचे यावेळी फोफलिया यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालयाच्या शिक्षकांनी आपण विद्यार्थ्यांना केलेले मौलिक मार्गदर्शन त्यांना सद्‌ग्रहस्थ म्हणून जगण्यासाठी जीवनात प्रेरणादायी ठरणार असल्याचे सांगून आपले वृद्धाश्रमरुपी समाजोपयोगी कार्य उत्तरोत्तर असेच चांगल्या पद्धतीने होत राहावे, अशी कामना करत सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी तेथून निरोप घेतला.

## किशोर शिंदे यांचे निधन



✔ **सुराज्य/नाझरे** : वझरे येथील उद्योजक किशोर शंकर शिंदे यांचे शनिवार ८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूप्रसंगी त्यांचे वय वर्षे ३४ होते. कै. शंकर शिंदे यांचा किशोर मोठा मुलगा होता व मेजर अक्षय शिंदे यांचे ते मोठे बंधू होते. शिंदे यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, भावजय असा मोठा परिवार आहे.

# श्री खंडोबा देवस्थानावर प्रशासकांची नियुक्ती करा

✔ सुराज्य/सोलापूर :

श्री बाळे येथील खंडोबा देवस्थानामध्ये स्वयंघोषित चेअरमन आणि सचिव यांनी मनमानी कारभार करत मोठा गैरप्रकार केला आहे. मंदिरातील विश्वस्त मंडळाचा कारभार संशययास्पद व बेकायदेशीर आहे. त्यामुळे या मंदिराचे विश्वस्त मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करावी, अशी मागणी मंदिराचे पुजारी, मानकरी, गावकरी यांनी धर्मादाय उपायुक्तांकडे केली आहे.

धर्मादाय उपायुक्त यांच्याकडे दिलेल्या तक्रारींमध्ये म्हटले आहे की- श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान बाळे रजिस्टर संस्था आहे. संस्थेचा बदल अहवाल सादर केला आहे मात्र आठ बदल अहवाल अद्याप प्रलंबित आहेत. यावरून मंडळाच्या विश्वस्त मंडळामध्ये वाद चालू आहे. या वादामळे धर्मादाय उपायुक्त सुनिता कंकणवाडी यांनी मंदिरास भेट देऊन पाहणी देखील केली आहे. देवस्थानचे चेअरमन विनय ढेपे, सचिव सागर पुजारी यांनी बेकायदा कारभार करत ३२ गुंठे जमिन सर्व्हे नंबर १/९ ही २ कोटी ५५ लाख रूपयाला खरेदी केली आहे. यासाठी देवस्थानच्या जिल्हा मध्यवर्ती बाळे येथील शाखेतून ५१ लाख परस्पर काढले आहेत. पुढील सहा महिन्यात २ कोटी ४ लाखांचे चेक दिले आहेत. हा व्यवहार पूर्ण नाही झाल्यास मंदिरास मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. सहा महिन्यात २ कोटी ४ लाख कसे उभे करणार, अद्याप मंदिराचे २०१४ पासून लेखा परिक्षण झाले नाही, मंदिराच्या परिसरात बेकायदा गाळे काढले आहे. हा सर्व व्यवहार संशयास्पद वाटत असल्याने बेकायदेशीर कारभार करणाऱ्या चेअरमन आणि सचिव यांच्या कारभाराची चौकशी करून विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याची मागणी धर्मादाय उपायुक्तांकडे केली आहे. दिलेल्या निवेदनावर अनेक गावकरी मानकरी पुजारी यांच्या सह्या आहेत. आता मंदिरातील विश्वस्तांचा वाद पुन्हा उफाळून आला आहे.

## पुजारी, मानकरी, गावकऱ्यांची धर्मादाय उपयुक्तांकडे मागणी

सहा वर्षे झाली. चेअरमन म्हणून काम करत आहे. त्यामुळे या मंडळींची एकही तक्रार नव्हती. मात्र दोन महिन्यांपासून देवस्थानची जागा खरेदी केल्यापासून मला टार्गेट केले आहे. मंदिराचा विकास होऊ नये. बाळ्याचा विकास होऊ नये अशी भावना या तक्रार करणाऱ्यांची आहे. आपल्या जबाबदारीवर मोठा व्यवहार केला आहे. हा व्यवहार रद्द व्हावा, मंदिराची बदनामी व्हावी यासाठी राजकरण आणत मंदिराला बदनाम करण्याचे कटकारस्थान तक्रार करणाऱ्या मंडळींचा उद्योग आहे. देवस्थानाचे भक्त मंडळी अशा खोट्या गोष्टींना बळी पडणार नाहीत मी मंदिरांचा विकास केल्या शिवाय राहणार नाही

**-विनय ढेपे**
(चेअरमन बाळे खंडोबा मंदिर )



## आचार्य नारायण गुरुजी यांच्या योगशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मंगळवेढा** : शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा संचालीका तथा इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज मंगळवेढाच्या उपप्राचार्य तेजस्विनी कदम, यांच्या संकल्पनेतून या शिबिरांचे आयोजन पतंजली योग परिवार, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा. बळीराजा पतसंस्था आणि धनश्री परिवाराकडून करण्यात आलेले आहे. मंगळवेढा येथे प्रथमच होत असलेल्या प्राचीन भारतीय विद्या केंद्र कोल्हापूर आचार्य नारायण गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या योग ध्यान आणि आहार शिबिरास मंगळवेढाकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिनांक ८ एप्रिल २०२३ ते २३ एप्रिल २०२३ पर्यंत वीरशैव मंगल कार्यालय व इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात आज १८० शिबिरार्थीने उस्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन बळीराजा पतसंस्थेचे चेअरमन दामोदर देशमुख ड बीबी जाधव मोहन जुंदळे , दिलीप कोष्टी, सुनंदा सपताळे यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. तर सायंकाळच्या योग शिबिराची शिबिराचे उद्घाटन इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज मंगळवेढाच्या उपप्राचार्य तेजस्विनी कदम, सोलापूर माजी शिक्षणमंत्री लक्ष्मणराव ढोबळे, आचार्य नारायण गुरूजी,शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव श्रीधर भोसले, प्राचार्य रविंद्र काशीद यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तरी या शिबिरात सहभागी होऊन जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या आरोग्य निरोगी ठेवावे असे आवाहन शिबिर समन्वयक योगशिक्षक संतोष दुधाळ आणि कृषिभूषण अंकुश पडवळे यांनी केले.शिबिर यशस्वी करण्याकरता नितीन मोरे, वैशाली वाघ, जयराम आलदर, मिलिंद कुलकर्णी, नवीन साळुंखे, दीपक शिनगारे, बालाजी शिंदे, आण्णा वाकडे इत्यादी प्रयत्न करत आहेत.

## आजपासून गोगांव येथे श्रीकल्लेश्वर महाराज यात्रा



**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील गोगांव येथे ग्रामदैवत श्री कल्लेश्वर महाराज यात्रा आज पासून सुरू होत असल्याची माहिती सरपंच सौ.वनिता सुरवसे यांनी दिली. सालाबादा प्रमाणे श्री कल्लेश्वर महाराज यात्रा मोठ्या उत्साहात साजरा होत असून दिनांक १० रोजी संध्याकाळी ठीक ८ वाजता उच्चई (लहान रथ ) कल्लेश्वर मंदिरा पासून हनुमान मंदिरापर्यंत नेला जातो, दिनाक ११ रोजी १२ वाजता रथावर कळसारोहण करण्यात येणार असून संध्याकाळी ८ वाजता रथोउत्सव होणार आहे. रात्री कन्नड नाटक होणार आहे, दिनांक १२ रोजी ३ वाजता जंगी कुस्ती आयोजित करण्यात आल्या आहेत, व त्यादिवशी च रात्री परत कन्नड नाटक होणार आहे. तरी सर्व भाविकांनी यात्रेनिमित्त आमच्या गावच्या जागृत देवस्थानाचे शिस्तीत दर्शन घेऊन यात्रा पंच कमिटीला व ग्रामपंचायतला सहकार्य करावे, प्रदूषणमुक्त यात्रा साजरी करून , सर्व शासकीय नियमाचे पालन करून यात्रा जल्लोषात साजरी करणार असे सरपंच सौ वनिता सुरवसे आणि उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी सांगितले. वागदरी येथील यात्रेमध्ये झालेल्या दुर्दैवी घटनेची दखल घेवून ग्रामपंचायत वतीने वैद्यकिय अधिकारी यांना पत्र देऊन डॉक्टर व म्बुलन्स यांची व्यवस्था करण्याची सूचना देण्यात आली असून प्रथमोपचाराचे सर्व सुविधाचे नियोजन करण्यात आले आहे. श्री कल्लेश्वर महाराज यात्रे निमित्त ११ व १२ या दोन्ही दिवशी महाप्रसदाची सोय करण्यात आल्याचे माहिती कलेश्वर देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष अशोक मुलगे, खजिनदार प्रदीप जगताप, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे व देवस्थान कमिटीने सांगितले आहे.



## महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी महादेव भाऊ ताटे

**वेळापूर** : शनिवारी रोजी वेळापूर येथे माळी समाजाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा गोविंदराव फुले यांच्या १९६ व्या जयंतीनिमित्त बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे नियोजन बैठक बोलवण्यात आली होती. यावेळी महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सावता परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष महादेवभाऊ ताटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. खजिनदारपदी अभिजीत म्हेत्रे , कार्याध्यक्षपदी सूर्यकांत मोहिते यांची निवड करण्यात आली.यावेळी वाखरी ग्रामपंचायत माजी सरपंच रघुनाथ पिसे, सोसायटीचे माजी सदस्य दत्तूभाऊ बनकर, माळशिरस वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड. डी. एस.राऊत, माळशिरस वकील संघटनेचे माजी सचिव ॲड.आर.एम. ताटे,पत्रकार ओंकार आडत यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सदर नियोजन बैठकीस माळी समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## सुरज सावंत यांची कृषी अधिकारीपदी निवड



**पिलीव** : इंन्सुट ऑफ बँकिंग पर्सनल (खइझड )मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेतून खुल्या प्रवर्गातून यूनियन बँक ऑफ़ इंडिया मध्ये कृषी अधिकारी पदी कोळेगाव ता.माळशिरस येथील सुरज बाळासाहेब सावंत-पाटील यांची निवड झाली आहे. सुरज सावंत यांचे पहिली ते चौथी चे शिक्षण जि प शाळेत तर पाचवी ते दहावी शिक्षण विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय कोळेगाव येथे,११ वी १२ सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज,इ.ॊल रसीळ- कर्मयोगी दूलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालय नाशिक, चील रसीळ- राजर्षि शाहू महाराज कृषी महाविद्यालय कोल्हापुर.येथे झाले आहे. सूरज सावंत यांच्या बँकेत कृषी अधिकारी पदावर झालेल्या निवडीबद्दल राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील,कोळेगांवच्या सरपंच सौ.रजनी दुपडे,उपसरपंच सौ.रेश्मा सावंत,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष डॉ.आनंद जाधव,तसेच विविध शाखेचे पदाधिकारी ,ग्रामस्थ यांनी सुरज सावंत यांचे अभिनंदन केले.

# अक्कलकोट मार्केट कमिटी निवडणूक

# शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वपक्षीय एकवटले

## अन्यथा कमिटीच्या आवारात धान्याचे साठवण तलाव तयार होईल-आनंद तानवडे



**सुराज्य/अक्कलकोट**

शेतकऱ्यांचे मंदिर म्हणून मार्केट कमिटीला संबोधले जाते. परंतु मागील कार्यकाळात सत्ताधाऱ्यांनी या ठिकाणी मोठा भ्रष्टाचार केला असून,यातून शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले आहे.

भविष्यात हीच परिस्थिती कायम राहिल्यास तालुक्याचे खूप मोठे नुकसान होणार आहे हे टाळण्यासाठी आम्ही सर्वजण पक्ष स्तरावरील मतभेद बाजूला ठेवून एकत्र आल्याचा सूर स्वामी समर्थ मार्केट कमिटी बचाव पॅनलच्या बैठकीत सर्वपक्षीय नेत्यांनी व्यक्त केला.

अक्कलकोट मार्केट कमिटीच्या निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झाला असून यात कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप शिवसेना या पक्षांसह इतर मित्र पक्षांनी एकत्रित येऊन सर्वपक्षीय आघाडी तयार केली आहे.

पुढील रणनीती ठरवण्यासाठी रविवारी अक्कलकोट येथे बैठक पार पडली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन काटगाव होते.यावेळी व्यासपीठावर माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे,जेष्ठ नेते अशपाक बळोरगी,

माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील,भाजपचे आनंद तानवडे आदी उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी सिध्दाराम म्हेत्रे, अशपाक बळोरगी,दत्ता शिंदे, मल्लिकार्जुन पाटील, आनंद तानवडे, मल्लिकार्जुन काटगाव, आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी तुकाराम बिराजदार, सिध्दार्थ गायकवाड, सुरेश गड्डी, शिवयोगी लालसंगे, महांतेश हत्तुरे, शिवप्पा कुंभार, लाला राठोड, कार्तिक पाटील, सिध्दु भंडारकवठे,शिवु स्वामी, अरुण जाधव, गुंडू अळळीमोरे, अशपाक आगसापुरे, सरफराज शेख, प्रकाश पाटील, बसवराज पाटील, प्रकाश दुपारगुडे, विनीत पाटील यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

### अन्यथा धान्याचा साठवण तलाव होईल :तानवडे

या बैठकीत बोलताना आनंद तानवडे यांनी मागील कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचाराचा पाढा वाचला.अनेक ठिकाणी भ्रष्टाचार सुरू आहे.शेतकऱ्यांनी संपूर्ण वर्षभर कष्ट करून आणलेल्या मालाची वजन करताना चोरी होत आहे.वजनाच्या ठिकाणी असलेल्या खड्ड्यात दररोज पंधरा-वीस क्विंटल माल साठतो.त्यांना पुन्हा एकदा निवडुन दिल्यास अक्कलकोटच्या मार्केट कमिटीत धान्याचा साठवण तलाव दिसेल,इतका भ्रष्टाचार होईल असा आरोप केला.

### .. म्हणून स्वामी समर्थ बचाव पॅनलची निर्मिती

अक्कलकोटच्या मार्केट कमिटीत शेतकऱ्यांच्या विरोधी कारभार सुरू आहे.प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचाराचे मुळ रोवली आहेत.हे उखडून काढण्यासाठी आम्ही सारे एकत्रित आलो आहोत.भ्रष्टाचाराचे सर्व पुरावे मतदारांसमोर आणणार आहोत.पुढच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक महत्वाची असल्याने माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण एकजुटीने लढणार असल्याचे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील,चेअरमन दत्ता शिंदे,मल्लिकार्जुन काटगाव, शिवयोगी लालसंगी आदींनी मनोगतातुन स्पष्ट केले.

## डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी यांना १६एप्रिलला रोजी प्रदान होणार महाराष्ट्र भूषण पुरस्कार

### नवी मुंबई खारघर येथे पुरस्कार वितरण सोहळा

**सुराज्य/उत्तर सोलापूर**



ज्येष्ठ निरूपण कार व सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री डॉ.दत्तात्रेय तथा आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने २०२२ या वर्षासाठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला असून तो १६ एप्रिल रोजी नवी मुंबईतील खारघर येथे हा पुरस्कार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रधान करण्यात येणारआहे या पुरस्कार सोहळयास देश, विदेशातून लाखोच्या संख्येने स्त्री सदस्य उपस्थित राहणार आहेत. धर्माधिकारी कुटुंबीयांनी स्वतंत्र पूर्वी म्हणजे १९४३ सालापासून डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांनी अवघ्या सात सदस्यावर अध्यात्मिक व सामाजिक कार्याची सुरुवात केली आज त्याचे वटवृक्षात रूपांतर झाले असून याचे गोवो-गावी,देश-विदेशात बैठक निरूपन कार्य चालू आहे. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून आध्यात्मिक, सामाजिक, बालसंस्कार बैठक, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान असे अनेक उपक्रम या प्रतिष्ठानच्या माध्यमातून केले जातात. २०२१चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना राज्य शासनाने नुकताच मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया येथे देऊन त्यांना सन्मानित केले होते. तर २०२२ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा १६ एप्रिल रोजी नवी मुंबई खारघर या ठिकाणी डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना देऊन होणार आहे.

## पिलीव येथे हनुमान जयंतीनिमित्त मिरवणूक

**सुराज्य/पिलीव**



पिलीव (ता. माळशिरस) येथे बजरंग दल, मोरया गणेश मित्रमंडळ, वडार समाजाच्यावतीने हनुमान जयंतीनिमित्त मुख्य पेठेतून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

प्रारंभी सजवलेल्या रथातील श्री हनुमानाच्या मूर्तीचे पूजन व मिरवणुकीचे उद्घाटन माजी सभापती संग्रामसिंह जहागीरदार, सरपंच नितीन मोहिते- माळी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गणेश पाटील, ॲड. सत्यजित गलांडे, ॲड. वैभव मेथवडे, लखन चौगुले, ब्रह्मदेव लोखंडे, अविनाश जेऊरकर, संजय आर्वे, शंकर काळे, लखन काळे, किशोर लोखंडे, सुनील काळे, भाऊ मदने, शिवाजी काळे, तानाजी लोखंडे, प्रवीण वाघमारे, युवराज सातपुते, सुनील खुर्द, आबा बनसोडे, सुजित सातपुते आदी उपस्थित होते.

मिरवणूक एस.टी. स्टँडपासून सुरू झाली व सांगता समारंभ साठेनगर येथे झाला.

हनुमान जयंतीचे औचित्य साधून येथील दक्षिणमुखी मारुतीच्या मूर्तीला मारुती मंदिराचे मानकरी पुजारी जयंत गोरे, जीवन गोरे, मोहन गुरव यांच्या हस्ते रुद्राभिषेक करून जन्माचा विधी पाळणा करण्यात आला. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे पिलीव परिसरातील चांदापुरी, पठाण वस्ती, झिंजे वस्ती, कुसमोड, काळमवाडी, बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी आदी ठिकाणीही हनुमान जयंती साजरी करण्यात आली.




## महावितरणच्या बारामती झोनमध्ये सोलापूर शहर प्रथम

### वीज वसुलीत उल्लेखनीय कामगिरी; अधिकारी आणि कर्मचाऱ्याचा गौरव

**सुराज्य/सोलापूर**

मागील आणि चालू वर्षा मध्ये विज ग्राहकांच्या विज बिलाची वसुली करुन उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महावितरण कंपनी सोलापूर शहर ई विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांचा गौरव सोलापूर जिल्ह्याचे अधिक्षक अभियंता संतोष सांगळे, कार्यकारी अभियंता आशिष मेहता, ई विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता चंद्रकांत दिघे यांच्या हस्ते करण्यात आला .

इंडिस्ट्रीयल इस्टेट सोसायटी या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास ए उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सारिका साळुंखे, बी विभागाचे राजेंद्र पाटील, सी विभागाचे गोपाळ देवकर, डी विभागाचे संजीव मैलापूर, यांच्यासह शाखाअधिकारी सुनंदा माशाळे, जुळे सोलापूर शाखेचे सुधीर ननवरे, कुंडलीक पवार, प्रेम राठोड, तसेच सहाय्यक लेखापाल संजय गायकवाड आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रास्ताविक सहाय्यक अभियंता नजीर मुजावर यांनी केले. यावेळी मागिल वर्षाच्या कामकाजाचा आढावा आणि पुढील वर्षाच्या ध्येयधोरणाबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता चंद्रकांत दिघे यांनी माहिती दिली.

## कृषी योजनांचा पावणेदोन हजार शेतकऱ्यांना लाभ

**सुराज्य/सोलापूर**

शेतकरी बांधवांना शेतीसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींच्या खरेदीसाठी तसेच शेतामध्ये विविध पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आर्थिक मदत मिळावी, यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या कृषि विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. पंढरपूर तालुक्यात कृषि विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून १ हजार, ८९६ शेतकऱ्यांना ६ कोटी, ४६ लाख, १२ हजार, ३०४ रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असल्याची माहिती तालुका कृषि अधिकारी भागवत सरडे यांनी दिली.

भागवत सरडे म्हणाले, शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच या योजना पारदर्शक व गतिमान पध्दतीने राबविण्यासाठी महाडीबीटी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्र शिकण्यापासून ते अनुदानावर शेतीसाठी आवश्यक उपकरणे खरेदी करता येत आहेत. कृषि विभागाच्या माध्यमातून प्रामुख्याने बियाणे, यंत्र व अवजारे, ठिबक तुषार संच इत्यादींची खरेदी तसेच शेततळे, खोदकाम, प्लास्टिक अस्तरीकरण, कांदा चाळ, शेडनेट गृह व हरितगृह उभारणी, फळबाग लागवड नियोजन, कृषि यांत्रिकीकरण आदि योजनांचा समावेश असल्याचे . सरडे यांनी सांगितले. पंढरपूर तालुक्यात कृषि विभागामार्फत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात कृषि यांत्रिकीकरण, ठिबक सिंचन, वैयक्तिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण, कांदाचाळ अशा विविध योजनांतून १ हजार ८९६ शेतकऱ्यांना ६ कोटी ४६ लाख १२ हजार ३०४ रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असून, शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही सरडे यांनी केले आहे.

## महिलेचा विनयभंग; रिक्षाचालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर** : पीडित महिलेलेच दुकान असून त्या आपल्या कोल्ड्रींग दुकानात असताना आरोपी रिक्षाचालकाने पीडित महिलेचा वाईट उद्देशाने हात पकडत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. महेबूब शेख (वय-३०,रा.सग्गम नगर,जुना विडी घरकुल) असे गुन्हा दाखल झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. पीडितेचे कोल्ड्रींगचे दुकान असून तेथे आरोपी महेबूब हा आला. त्याने पैसे देण्याच्या बहाण्याने पीडितेचा वाईट उद्देशाने हात पकडले. शिवाय त्यानंतरही तो वारंवार दुकानासमोर चकरा मारत होता.ही घटना सुरूवातीला पीडितेने घरात सांगितली नाही. पण नंतर मात्र याबाबतची माहिती पतीला सांगितली त्यानंतर या बाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून रिक्षाचालकावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त माळशिरसला विविध कार्यक्रम

**सुराज्य/अकलूज**


माळशिरस येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही माळशिरस येथील सिद्धार्थ नगर येथे महामानवांच्या जयंतीचे साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये शुक्रवार दिनांक १४ एप्रिल रोजी प्रभात फेरी झेंडावंदन नालंदा बुद्ध विहार येथे झेंडावंदन बुद्ध पूजा व याच दिवशी स्नेह भोजनाचे आयोजन देखील करण्यात आले आहे. दिनांक १५ एप्रिल रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रम, आटपाडी येथील नानासाहेब पिसे यांचा अंधश्रद्धे वरील कार्यक्रम, दिनांक १६ रोजी बार्टी विभागाचे विभागप्रमुख डॉक्टर सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक रविवार १७ रोजी दंगलकार नितीन चंदनशिवे यांच्या कवितेची काव्य मैफिल आयोजित करण्यात आली आहे. दिनांक १८ सोमवार रोजी जयंती पिक्चर, १९ रोजी शुभांगी शिंदे- मी सावित्री बोलतेय दि २० रोजी विविध गुणदर्शन ग्रुप डान्स शो, दि २१ रोजी फलटणचे सुप्रसिद्ध जादूगार गोगा यांचा कार्यक्रम तर दि २२ रोजी सायंकाळी ५ वाजता महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची भव्य दिव्य मिरवणूक निघणार आहे. तरी सदर कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन जयंती महोत्सव समिती व नालंदा बुद्ध विहार ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## माढ्यात महात्मा जोतीराव फुले यांचा जयंतीमहोत्सव; महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने विविध कार्यक्रम

**सुराज्य/माढा**



माढ्यातील महात्मा फुले प्रतिष्ठान च्या वतीने क्रांतीसूर्य राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांच्या १९६ व्या जयंतीनिमित्त १० एप्रिल ते १२ एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक अजिनाथ माळी यांनी दिली.

सोमवार दिनांक १० एप्रिल रोजी सकाळी ७ वा अग्निवीर ( आर्मी) भरतीच्या तयारीसाठी तरूणांसाठी शाररिक आणि बौद्धीक सराव चाचणीचे आयोजन कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले आहे.तर ११वाजता नगरपंचायत सभागृहात खुल्या गटासाठी रांगोळी स्पर्धाचे आयोजन केले आहे.

मंगळवार दिनांक ११ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी ९ वा क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन मान्यवरांचे उपस्थितीत करण्यात येणार आहे.याचठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन करणायात आले असून या कार्यक्रमांनतर माढेश्वरी मंदीर परिसरात संतशिरोमणी सावता माळी महाराजांच्या मंदीराचे भूमीपूजन केले जाणार आहे.बुधवार दिनांक १२एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात सायंकाळी %वाजता स्पर्धाचे पारितोषिक वितरण होणार आहे.यानंतर प्रसिद्ध व्याख्यात्या प्रा कविता म्हेत्रे यांचे शिव फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांची गरज या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन महात्मा फुले प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आले आहे.

# २७ लाख नागरिक बूस्टरच्या प्रतीक्षेत...

## कोव्हिड रुग्णसंख्येत वाढ होताच लशींच्याही मागणीत वाढ

सुराज्य/पुणे

**शहरातील २७ लाख नागरिकांचा 'बूस्टर' डोस घेणे बाकी आहे. शहरात काही दिवसांपासून कोरोनाबाधितांच्या संख्येत वाढ होत असल्याने नागरिकांकडून लशींची मागणी होत आहे. मात्र, सध्या महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे लस उपलब्ध नसल्याने शहरातील लसीकरण ठप्प झाले आहे. त्याचबरोबर, खासगी रुग्णालयांमध्येही लस नसल्याने 'बूस्टर' घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांकडून लस कुठे मिळेल याची विचारणा होत आहे.**

लशींचा साठा उपलब्ध नसल्याने लसीकरण बंद आहे. या आठवड्यात लशींचा साठा उपलब्ध झाल्यावर लसीकरण पुन्हा सुरू होणार आहे. लसीकरण सुरू झाल्यावर मुलांच्या लसीकरणावर भर देण्यात येईल.

**- डॉ. भगवान पवार, आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका.**




शहरात आतापर्यंत झालेल्या लसीकरणात सर्वाधिक नागरिकांनी 'कोव्हिशील्ड' लस घेतली आहे. मात्र, केंद्र सरकारने गेल्या काही महिन्यांपासून राज्य सरकारला 'कोव्हिशील्ड' लशींचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे महापालिका आरोग्य विभागाला 'कोव्हिशील्ड' लस उपलब्ध झालेली नाही. त्याचबरोबर 'कॉर्बेव्हॅक्स' लशींचा देखील पुरवठा गेल्या काही महिन्यांपासून झालेला नाही. त्यामुळे महापालिका केंद्रांवर ३१ एप्रिलपर्यंत फक्त 'कोव्हॅक्सिन' लस उपलब्ध होती. त्यामुळे ज्या नागरिकांनी पूर्वी 'कोव्हिशील्ड' आणि 'कॉर्बेव्हॅक्स' लशींचा डोस घेतला होता त्यांना बूस्टर घेता आला नाही.



# आषाढी वारीचे वेळापत्रक जाहीर

सुराज्य/पुणे

**संत तुकाराम महाराज संस्थान, देहू यांच्याकडून ३३८ व्या पालखी सोहळ्याचं संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे.**

संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा प्रस्थान सोहळा यंदा १० जून रोजी होणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पालखी सोहळा २९ जून रोजी पंढरपूरमध्ये दाखल होईल. २९ जून ते ३ जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे, अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख भानुदास महाराज मोरे यांनी दिली.

यावेळी संस्थानचे अध्यक्ष पुरूषोत्तम महाराज मोरे, पालखी अजित महाराज मोरे व विश्वस्त माणिक महाराज मोरे, संतोष महाराज मोरे, विशाल महाराज मोरे आदी उपस्थित होते.

### पालखी सोहळ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे

शनिवार दि. १० जूनला पालखी प्रस्थान दु. २ वाजता होणार असून पालखीचा पहिला मुक्काम इनामदार वाड्यात. * रविवार ११ जूनला पालखी सकाळी १०.३० वाजता येथील इनामदार वाड्यातून निघून औद्योगिक नगरीकडे आकुर्डी येथील दुसऱ्या मुक्कामासाठी रवाना. * सोमवार १३ जूनला नानारपेठ श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी, * मंगळवार १३ जूनला पालखी येथे दिवसभर भाविकांना दर्शनासाठी मुक्कामी, * बुधवार १४ जून लोणीकाळभोर, * गुरूवार १५ जूनला यवत, * शुक्रवार १६ जून वरवंड, * शनिवार १७ जून उंडवडी गवळ्याची,* रविवार १८ जून जुन बारामती, * सोमवार १९ जून सणसर, * मंगळवार २० जून आंथुर्णे येथे पहिले गोल रिंगण व मुक्काम, * बुधवार २१ जून निमगाव केतकी, * गुरूवार २२ जून इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण व मुक्काम, * शुक्रवार २३ जून सराटी, * शनिवार २४ जून रोजी सकाळी निरा स्नान व दुपारी तिसरे गोल रिंगण आणि मुक्काम अकलूज, * रविवार २५ जून रोजी सकाळी माळीनगर येथे पहिले उभे रिंगण आणि रात्री बोरगाव येथे पालखी मुक्काम, * सोमवार २६ जून रोजी सकाळी धावा व रात्री पालखीचा पिराची कुरोली येथे मुक्काम, * मंगळवार २७ जून रोजी बाजीराव विहिर येथे उभे रिंगण व रात्री वाखरी येथे मुक्काम, * बुधवार दि. २८ जून रोजी पालखी वाखरी वरून पंढरपुरात दाखल, * गुरुवार २९ जून रोजी पालखी श्री क्षेत्र पंढरपूर श्री संत तुकाराम महाराज संस्थान (मंदिर) येथे मुक्कामी, * २९ जून ते ३जुलै पर्यंत पालखी सोहळा हा पंढरपूर येथे असणार आहे. त्यानंतर ३ जुलै नंतर कल्याचे किर्तन झाल्यानंतर पालखीचा परतीचा प्रवास सुरू होऊन पालखी १३ जुलै रोजी देहू येथे विसावणार, अशी माहिती देखील देहू संस्थांकडून देण्यात आली आहे.

# शिवसेना विभाग प्रमुखाला संपविण्यासाठी १० लाखांची सुपारी

## पूर्ववैमनस्यातून रचला कट

सुराज्य/ठाणे

**बांधकाम व्यावसायिक आणि शिवसेनेचे विभाग प्रमुख सुनील सिंग ऊर्फ कलवा यांच्या हत्येसाठी १० लाख रुपयांची सुपारी देण्यात आल्याचा प्रकार उल्हासनगरात समोर आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी सुनील शर्मा नावाच्या आरोपीला अटक केली असून दुसरा आरोपी कारी माखिजा याचा पोलीस शोध घेत आहेत.**




कॅम्प नंबर तीन येथील शिवसेनेचे विभाग प्रमुख आणि बांधकाम व्यावसायिक सुनील सिंग ऊर्फ कलवा आणि कारी माखिजा यांचा गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू आहे. या दोघांचा वाद यापूर्वीही पोलिस स्टेशनपर्यंत गेला आहे. कारी माखिजा यांच्याकडून सुनील सिंग यांच्या हत्येचा कट रचून त्यासाठी सुनील शर्मा नावाच्या व्यक्तीला १० लाखांची सुपारी दिल्याची माहिती सिंग यांच्या काही निकटवर्तीयांनी त्यांना दिल्याचे त्यांना सांगितले. त्यानुसार सिंग यांनी उल्हासनगरचे सहाय्यक पोलीस आयुक्त मोतीचंद राठोड यांच्याकडे धाव घेत आपल्या जीवाला धोका असल्याबाबत पोलिसात तक्रार केली. सिंग यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी सुनील शर्मा नावाच्या व्यक्तीला चौकशीसाठी ताब्यात घेतले. या प्रकरणी उल्हासनगर पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शर्मा याची चौकशी केली असता, कारी माखिजा याने आपल्याला सुनील सिंग याच्या हत्येची सुपारी दिल्याची कबुली शर्मा याने दिली. त्यामुळे पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल करत सुनील शर्मा याला अटक केली आहे. तसेच सिंग यांच्या हत्येची सुपारी देणारा आरोपी कारी माखिजा याचा उल्हासनगर पोलीस शोध घेत आहेत.

# सरकारपेक्षा समाजच मराठीचा मारेकरी

## 'हीरक महोत्सवी महाराष्ट्र' सत्रात तज्ज्ञांची स्पष्टोक्ती

सुराज्य/पुणे

**'मराठी भाषक समाज भाषेबद्दल उदासीन आहे. त्यांचा राज्यकर्त्यांवर दबाव नाही. इतर देशांमध्ये त्यांच्या भाषांबाबत हे होत नसल्याने त्या सुरक्षित राहतात. महाराष्ट्रात मराठी भाषा न बोलता कोणत्याही माणसाला राहता येते. मराठी माणसाने मराठी अस्मिता टोकदार करावी, तरच राजकीय पक्ष ऐकतील', असे सांगत 'हीरक महोत्सवी महाराष्ट्र' या व्याख्यानात भाषाविचार या चर्चेमध्ये तज्ज्ञांनी मराठी समाजाच्या मराठी जपण्याप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव करून दिली.**

'ग्रंथाली' या वाचक चळवळीच्या माध्यमातून नवी मुंबई महापालिका आणि प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालयाच्या सहयोगाने



'हीरक महोत्सवी महाराष्ट्र' या व्याख्यानसत्राचे वाशी येथील साहित्य मंदिर सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले होते. भाषाविचार या चर्चासत्राचे अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी, हिंदी आणि इंग्रजीचे मराठीवरील अतिक्रमण पाहता आपण भाषिक गुलाम झालो आहोत, असे प्रतिपादन केले. आपली अस्मिता कमी पडते असे सांगताना त्यांनी प्रमाणभाषेपेक्षा सुबोध मराठीची गरज व्यक्त केली. मराठी ही ज्ञानभाषा कशी होईल, या मुद्द्यावर त्यांनी विवेचन केले. भाषाशुद्धीचा फारसा विचार होऊ नये, अशी मांडणी त्यांनी केली.

या चर्चासत्रामध्ये भाषा सल्लागार समितीचे सदस्य, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी रोखठोक शैलीत राज्यकर्त्यांच्या पातळीवर भाषा, साहित्य, संस्कृती या स्तरावर ठणठणाट असल्याचे कोरडे ओढले. मराठीची गेल्या ६० वर्षांमधील स्थिती काय आहे, यासंदर्भात राज्य सरकारकडे दस्तावेज नाहीत. मराठीची श्वेतपत्रिका काढण्यासाठी गेली २५ वर्षे प्रयत्न करूनही कार्यवाही होत नाही', असे ते म्हणाले. भाषा शिक्षणाचा अभाव, मराठी शाळा बंद होऊन इंग्रजी शाळांना मिळणारी चालना, याचाही आढावा त्यांनी घेतला. भाषेवर असलेला उच्चवर्णियांचा प्रभाव, प्रमाण भाषा, भाषेबद्दलचे अज्ञान या विषयांकडेही त्यांनी लक्ष वेधले.

# शेतकरी हवालदिल, गारपिटीमुळे मोठे नुकसान

सुराज्य/संभाजीनगर : मार्च महिन्यात झालेला अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे विभागातील ६० हजार ४०२ हेक्टरवरील रब्बी पिकांसह फळबागांचे मोठे नुकसान झालेले असतानाच पुन्हा एकदा अवकाळी पावसासह गारपीट झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

शनिवारी सकाळी साडेअकराच्या नोंदीनुसार गेल्या २४ तासांत मराठवाड्यात ४.१ मिमी पाऊस झाला आहे. या दोन दिवसांत वीज पडून चार जणांचा मृत्यू झाला; तर ५४ जनावरे दगावली. दरम्यान, शनिवारी बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणींत भर पडली आहे.

खरीप हंगामात अतिवृष्टी, सततचा पाऊस आणि गोगलगायींचा प्रादुर्भाव यामुळे मराठवाड्यातील लाखो हेक्टरवरील पिकांसह फळबागांना फटका बसला. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला.

रब्बी हंगाम चांगला जाईल, अशी शेतकऱ्यांना आशा होती. पुरेसा पाणी उपलब्ध असल्याने रब्बीचा पेराही चांगला झाला; परंतु गव्हासह अन्य पिके काढणीला असतानाच मार्च महिन्यात छत्रपती संभाजीनगरसह विभागांत अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला; तसेच अनेक ठिकाणी गारपीटही झाली. सुमारे ६० हजार ४०२ हेक्टरवरील रब्बी पिकांसह फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.

# जीभ कापून टाकेन

# राहुल गांधींना शिक्षा सुनावणाऱ्या न्यायाधीशांना धमकी

सुराज्य/नवी दिल्ली

**काँग्रेस नेते राहुल गांधींना शिक्षा सुनावणाऱ्या न्यायाधीशांना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून धमकी देण्यात आली आहे. मोदी आडनाव बदनामीप्रकरणी दोषी ठरल्यानंतर राहुल गांधी यांची खासदारकी रद्द झाली. त्यानंतर विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. तर दुसरीकडे काँग्रेस नेत्याने थेट राहुल गांधीना शिक्षा सुनावणाऱ्या न्यायाधीशांना धमकी दिली आहे.**


राहुल गांधींची खासदारकी रद्द केल्यानंतर त्याविरोधात तामिळनाडूच्या दिंडीगुलमध्ये काँग्रेस पक्षाच्या एससी/एसटी शाखेने निषेध केला.

यावेळी दिंडीगुलचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष मणिकंदन यांनी आपल्या भाषणादरम्यान काँग्रेसची सत्ता आल्यास राहुल गांधींना तुरुंगवासाची शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशाची जीभ कापून टाकण्याची धमकी दिली. २३ मार्च रोजी सुरत न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आमचे नेते



राहुल गांधी यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली.

न्यायमूर्ती एच. वर्मा ऐका, जेव्हा काँग्रेस सत्तेवर येईल तेव्हा आम्ही तुमची जीभ कापून टाकू, असा इशारा मणिकंदन यांनी आपल्या भाषणातून दिला. दुसरीकडे ही बाब निदर्शनास आल्यानंतर स्थानिक पोलीस ठाण्यात मणिकंदनविरुद्ध तीन कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच दिंडी उत्तर पोलिसांनी वादग्रस्त विधानांची चौकशी सुरू केली आहे.



# पिस्तुलाचा धाक दाखवून दीड लाखाची रोकड पळवली

**वाई** : सातारा शहरात रात्री पिस्तुलाचा धाक दाखवून कपड्याच्या दुकानातून दीड लाख लुटल्याची घटना रात्री उशिरा घडली आहे. पुणे-कोल्हापूर महामार्गावर अजंठा चौकात ही घटना घडली. यामुळे व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दुकान बंद करण्याची तयारी सुरू असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी दुकानात प्रवेश करून दुकानदाराला व कर्मचाऱ्यांना पिस्तुलाचा धाक दाखवत पैशाची मागणी करून गल्ल्यातील सुमारे दीड लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन पोबारा केला.

### मा. प. मंगुडकर यांचे निधन



**सुराज्य/पुणे** : विधानपरिषदेचे माजी सदस्य डॉ. मा. प. मंगुडकर यांचे वैजापूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९८ वर्षांचे होते. डॉ. मंगुडकर हे दोन वेळा विधानपरिषदेचे सदस्य होते. त्यांची संपूर्ण कारकिर्द पुण्यामध्ये गेली. पुणे महानगरपालिका शताब्दी ग्रंथाचे लेखन आणि संकलन त्यांनी केले होते. अभ्यासू सदस्य म्हणून त्यांचा नावलौकिक होता. गेली अनेक वर्षे ते छत्रपती संभाजीगरमधील वैजापूर येथे मुलीकडे वास्तव्यास होते.

### आलाबाद ग्रामपंचायतीला 'महिला मैत्री गाव'चा राष्ट्रीय पुरस्कार

**सुराज्य/कोल्हापूर** : आलाबाद (तालुका कागल) ग्रामपंचायतीला २०२३ मधील 'महिला मैत्री गाव' (महिला स्नेही) हा दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. त्यांनी या मानांकनात देशात तृतीय क्रमांक पटकावला. त्याला ३० लाख रुपये मिळणार आहेत.

हे वृत्त समजताच शनिवारी ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करून आनंद साजरा केला. पुरस्काराचे वितरण १७ एप्रिलला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होईल.

### सट्टा घेणारे बुकी पोलिसांच्या जाळ्यात

सुराज्य/पुणे

पुण्यातील कोंढव्यामधील आयपीएलच्या सामन्यावर मोठ्या प्रमाणावर सट्टा घेणाऱ्या बुकींवर पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने शनिवारी रात्री छापा टाकला. याप्रकरणी नऊ जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून संगणक लॅपटॉप, मोबाईल संच, रोकड असा पाच लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. हेमंत रवींद्र गांधी, अजिंक्य शामराव कोळेकर सचिन सतीश घोडके, यशप्रताप मनोजकुमार सिंह, धर्मेंद्र संगमलाल यादव, रिंगल चंद्रशेखर पटेल, अनुराग फुलचंद यादव, इंद्रजित गोपाल मुजुमदार आणि सतीश संतोष यादव अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

# आभाळ फाटले, काळीज तुटले

## हाताच्या फोडासारखे पिकांना जपले, अवकाळी पावसाने सारे हिरावले

सुराज्य/धाराशीव

**राज्यात शुक्रवारपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. भर उन्हाळ्यात सर्वसामान्य लोकांनी जरी या पावसाने काहीसा दिला असला तरी शेतकरी मात्र हवालदिल झाला आहे. द्राक्षे, आंबा, टरबूज, संत्रा, कलिंगड, गहू, कांदा, हरभरा अशा सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. धाराशीव जिल्ह्यात अवकाळी पावसाने शनिवारी अक्षरशः धुमाकूळ घातला येडशी, शिराढोण, तडवळा, वाडी आणि बामणी या भागात गारांचा पाऊस झाला आहे.**

शेतकऱ्यांनी पै-पै गोळा करुन फळबागा लावल्या आहेत. अहोरात्र मेहनत करुन फळबागा जगवल्या आहेत. मात्र, अवकाळी पावसात हातातोंडाशी आलेल्या फळबागा माती मोल झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरी पुन्हा अडचणीत सापडला आहे.

वाडी बामणी येथील बाबासाहेब उंबरदंड यांनी दिड एकरवर व्यंकट जातीचे कलिंगड लागवड केली होती. यासाठी त्यांनी पावणे दोन लाख रुपये खर्च केला होता. यातून ५ ते ६ लाख रुपये उत्पन्न मिळणार होते. पुढील ४ दिवसात तोडा होणार होता. मात्र, काल झालेल्या गारपिटीत कलिंगड मातीमोल झाले.तडवळा येथील सिताबाई सुरवसे, तानाजी सुरवसे, शिवाजी सुरवसे यांची द्राक्ष बाग जमिनदोस्त झाली आहे. सुरवसे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

राज्यात मागील तीन-चार वर्षात दुष्काळाचं सावट काहीसे कमी झालंय आहे. पण अवेळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान हे न भरून येणारे आहे. खरं तरं हा काळ रब्बीचे पिकं घेण्याचा होता. मात्र फळपिकांचे झालेलं नुकसानीने शेतकऱ्यांचा हाता तोंडाशी आलेला घास अवकाळीने हिरावून घेतला आहे.

राज्यात मागील ३ ते ४



वर्षात दुष्काळाचं सावट काहीसं कमी झालं आहे. पण अवेळी पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे पुरत हाल झालेले आहेत. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं झालेलं नुकसान हे न भरून येणारं आहे. खरं तर हा काळ रब्बीचे पिके घेण्याचा होता. मात्र, फळपिकांचे झालेलं नुकसानीने शेतकऱ्यांचा हाता तोंडाशी आलेला घास अवकाळीने हिरावून घेतला आहे.

# मध्यप्रदेशातून पिस्तूल आणून नांदेडला विकायचे; तिघांचा अटक

सुराज्य/नांदेड

**काही दिवसांपूर्वी शहरात झालेल्या गोळीबारच्या घटनेनंतर नांदेड पोलीस सतर्क झाले आहेत. शहरात विविध ठिकाणी ऑलआउट ऑपरेशन राबवून गुन्हेगारांकडून शस्त्रे जप्त केली जात आहे. शनिवारी वजीराबाद पोलिसांनी तीन सराईत गुन्हेगारांना अटक करुन चार पिस्तूल आणि ३० जिवंत काडतूस जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेले काडतूस आणि पिस्तूल मध्यप्रदेश राज्यातून खरेदी केल्याचे तपासात स्पष्ट झालं आहे.**

दोन दिवसापूर्वी वजीराबादच्या डीबी पथकाने गोवर्धनघाट परिसरात एका आरोपीकडून पिस्तूल जप्त केली होती. तपासादरम्यान सिडको



येथील भोलासिंग ऊर्फ हरजीतसिंघ ऊर्फ पोलो चरणसिंघ बावरी याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस भोलासिंग वर पाळत ठेवत होते. आरोपी हा हिंगोलीगेट परिसरात पिस्तूल विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून आरोपीला ताब्यात घेतले. अंग झडती घेतल्यानंतर आरोपीकडे एक पिस्तूल आणि ७ जिवंत काडतूस आढळून आले. सदरच्या आरोपीची चौकशी केली असता त्याने तीन पिस्तूल आणि काडतूस विक्री केल्याची माहिती समोर आली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी महम्मद तौफिक शेख सनदलजी याच्याकडून एक पिस्तूल आणि २३ काडतूस आणि गोविंदनगर येथील रोशन सुरेश हाळदे याच्याकडून एक पिस्तूल जप्त केले.




# पंढरपूर मार्केट कमिटीच्या निवडणुकीची उत्कंठा...



**सूरज सरवदे**

**पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर गेल्या २५ वर्षांपासून माजी आमदार प्रशांत परिचारक गटाचे वर्चस्व आहे. बाजार समितीची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सत्ताधारी परिचारक गटाचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी विरोधकांना एक-दोन जागा देण्याची भूमिका सत्ताधाऱ्यांची आहे. मात्र विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांच्या गटाने उमेदवारी अर्ज भरल्यामुळे बाजार समितीच्या निवडणुकीत ट्विस्ट निर्माण झाला आहे.**

बाजार समितीच्या १८ जागांसाठी ११७ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहे. त्यापैकी २५ अर्ज बंद ठरवण्यात आले आहेत. बिनविरोध होण्याच्या वाटेवर असणाऱ्या या निवडणुकीत विक्रमी अर्ज आल्याने ही निवडणूक आता बिनविरोध होण्याची शक्यता कमी वाटत आहे.

माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सुधाकरपंत परिचारक यांच्या कार्याची आठवण करून देत विरोधकांनाही सामावून घेऊन निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पंढरपुरातील भालके-काळे-युवराज पाटील यांच्या गटाला काही जागा देऊन बाजार समितीची निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांना परिचारक -भालके - काळे यांच्या युतीची भणक लागताच त्यांनी या निवडणुकीत उडी घेतली. त्यांच्या राजकीय खेळीमुळे पंढरपूरच्या राजकारणात मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे. पंढरपूर बाजार समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने पांडुरंग परिवार आणि विठ्ठल परिवार एकत्र आला आहे. स्व. भारत नाना भालके यांच्या निधनानंतर परिचारक यांचा कट्टर विरोधक गमावला आहे. त्यातच अभिजीत पाटील हे परिचारकांचे विरोधक आहेत हे सिद्ध होत आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने परिचारक यांना विरोध करणारे भालके - काळे हे सत्तेसाठी एकत्र येतील, असा कयास बांधला जात असताना अभिजीत पाटील हे परिचारकांचे विरोधक आहेत, हा मेसेज या निवडणुकीच्या माध्यमातून विठ्ठल परिवारात रुजला जाण्याची शक्यता आहे. एकंदरीत, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर अनेक वर्षांपासून प्रशांत परिचारक यांचे वर्चस्व असताना या निवडणुकीत विरोधकांची भूमिका बजावत अभिजित पाटलांनी रंगत आणली आहे.

### समविचारीची हवा काढण्यासाठी अवताडे एकत्र येणार?

परिचारक आणि भालके यांनी मिळून मंगळवेढा येथे समविचारी आघाडीचा प्रयोग संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या निमित्ताने केला होता. त्याचीच पुनरावृत्ती मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत त्यांच्याकडून होताना दिसत आहे. समविचारी आघाडीच्या माध्यमातून उमेदवारी अर्ज देखील दाखल करण्यात आले आहेत. मात्र आमदार समाधान आवताडे आणि ज्येष्ठ नेते बबनराव अवताडे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चा मंगळवेढ्यात रंगू लागली आहे. जर आमदार समाधान आवताडे आणि बबनराव अवताडे एकत्र आले तर मंगळवेढ्यातील सविचारी आघाडीची हवाच निघून जाईल, असे बोलले जात आहे. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती बिनविरोध करण्यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक हे प्रयत्नशील आहेत मात्र मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये परिचारक समर्थकांनी आमदार समाधान आवताडे यांच्याविरुद्ध पुन्हा समविचारीचा झेंडा घेतला आहे. त्यामुळे राज्यात आणि देशात भाजपाची सत्ता असताना पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात मात्र भाजपात कुरघोडीचे राजकारण सुरू आहे.

## मार्केट कमिटी इलेक्शन...

# मोहोळच्या राजकारणावर मालकांचीच हुकूमत

## भाजपाचा निर्धार हवेत विरला...

**संजय आठवले**

**मोहोळ कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक बिनविरोध पार पडली. १८ जागांसाठी १८ जणांनीच फॉर्म भरले. त्यामुळे माजी आमदार राजन पाटील यांनी पुन्हा एकदा तालुक्याच्या राजकारणातले मालक कोण आहे? हे एकप्रकारे जिल्ह्यालाच नव्हे तर राज्याला दाखवून दिले. असे असले तरी भाजपावाले गप्प कसे राहीले? त्यांच्यात राजन पाटलांच्या विरोधात लढण्याचा दम नव्हता का? का भाजपाने त्यांना भाजपा प्रवेशाचे टार्गेट देवून मुद्दामच मोकळे सोडले का? अशीही चर्चा तालुक्यात होवू लागली आहे.**



माजी आमदार राजन पाटील यांनी सलग तीन वेळा मोहोळ मतदार संघात निवडून येवून हॅट्रिक केली असली तरीही पुन्हा तीन वेळा पाहिजे, तो नवखा उमेदवार निवडून आणून दाखवला. हे जरी खरे असले तरी एवढ्यावर नाही तर सहकार क्षेत्रामध्येही त्यांचे काम चांगले आहे. सध्या त्यांच्या पक्षाची राज्यात सत्ता नसतानाही मोहोळच्या कृषी उत्पन बाजार समितीत निर्विवाद वर्चस्व माजी आमदार राजन पाटील यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले.

राज्यातील सर्वच कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. त्यामुळे ही बाब मोहोळ तालुक्यातील राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना किंवा राजन पाटील याच्या विरोधकांना माहिती नाही. ती लपवून ठेवली असा काही प्रकार नसताना जग जाहीर निवडणूक असताना विरोधक उमेदवारी अर्ज दाखल करत नाहीत? महाआघाडीत असणाऱ्या काँग्रेस, ठाकरे शिवसेना यांच्या बाबत समजून घेता येईल परंतु राज्यात विरोधी पक्षाचे सरकार असताना भाजपा सारख्या पक्षातील किंवा शिदे गटातील एकानेही एखाद्या जागेवर साधा फॉर्म भरला नाही. यामागचे गौडबंगाल काय? असा प्रश्न सर्व सामान्य माणसाच्या मनात आल्या शिवाय राहत नाही. शिवाय मागील बाजार समितीच्या सदस्यात भाजपाचे तत्कालीन तालुका अध्यक्ष सतीश काळे व अवताडे यांची शासकीय प्रतिनिधी म्हणून बाजार समितीवर निवड झाली होती त्यामुळे त्यांना बाजार समिती व बाजार समितीचा कारभार चांगला माहीत आहे

भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत महाडिक यांनी निवडणूक लढवली व त्यांनी यापुढील निवडणुकीत माजी आमदार राजन पाटील यांच्या विरोधात लढणार, असा निर्धार व्यक्त केला होता. परंतु तेही यावेळी शांत राहिले. त्यांचा निर्धार हवेत विरला, असे दिसत आणि वाटत असले तरी पडद्याच्या पाठीमागे बऱ्याच घडामोडी झाल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अन्यथा भाजपाने सहजासहजी निवडणूक सोडली नसती? कारण महाडिक मुरब्बी राजकारणी आहेत. ते भरसभेत निर्धार व्यक्त केल्यानंतर पुढे काही का होईना किमान काही जणांचे उमेदवारी अर्ज तरी दाखल केले असते ना? राहिला प्रश्न मोहोळच्या क्षीरसागरांचा, परंतु त्यांनी आजवर विधानसभेच्या निवडणुकीशिवाय अनगरकरांना कधीही विरोध केला नाही व केल्याचे दिसले नाही

बाजार समितीच्या निवडणुकीत मालकांनी भाजपाला शब्द दिला का? भाजपाने त्यांना पक्ष प्रवेशाचे टार्गेट दिल्याने विरोध न करता मोकळे सोडले का? अशी चर्चा तालुक्यात होवू लागली आहे

## कुर्डूवाडी मार्केट कमिटी इलेक्शन...

# बिनविरोधची परंपरा खंडित होणार का?

**उल्हास पाटील**

**कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये सत्ताधाऱ्यांसह शिवसेना, काँग्रेस, मनसे, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी कामगार संघटना आदी राजकीय पक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. माढा तालुक्यातील सर्व मतदार संघामध्ये शिंदे बंधूंचे वर्चस्व असल्यामुळे बहुमताने सत्ता निश्चित येणार असल्याचे बोलले जात आहे. या कृषी उत्पन्न बाजार समितीवर ३० वर्षाची बिनविरोध निवडूक होण्याची परंपरा यंदा खंडित होणार का? शिंदे बंधू पुन्हा निवडणुका बिनविरोध करण्यासाठी यशस्वी ठरतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



कुर्डूवाडी बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये सहकारी सर्वसाधारण, महिला, इतर मागासवर्ग, भटक्या जाती जमाती/ ग्रामपंचायत सर्वसाधारण, आर्थिक दुर्बळ, अनुसूचित जाती जमाती, व्यापारी मतदारसंघ, हमाल तोलार मतदारसंघवर माढ्याचे आमदार बबनराव शिंदे व करमाळ्याच्या आमदार संजय शिंदे यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे त्यांचे पारडे या निवडणुकीत जड असणार आहे.

यंदा निवडणुकीमध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी सावंत, संजय कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना, धनाजी साठे यांची काँग्रेस, प्रशांत गिड्डे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे, शिवाजी पाटील, सिद्धेश्वर घुगे स्वाभिमानी शेतकरी संघटना व बाळासाहेब पाटील, प्रवीण पाटील यांच्या शेतकरी कामगार पक्ष सह छोट्या मोठ्या राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. परंतु उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसांमध्ये कोण राहणार व कोण ऍडजेस्ट होणार याची चर्चा सुरू झाली आहे.

### शिंदे बंधूंची रणनीती सुरू

बाजार समितीच्या निवडणुका बिनविरोध करण्यासाठी शिंदे बंधू शिवसेनेला व काँग्रेस सदस्य पद देतील का? स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकरी कामगार पक्षाला पुढील निवडणुकीत किंवा कुठल्यातरी पदावर घेण्याचे आश्वासन देतील का? तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना व इतर राजकीय पक्षांना काही आश्वासने देऊन बाजार समितीच्या निवडणुका बिनविरोध करण्यासाठी शिंदे बंधूंना यश येईल, अशी नागरिकांतून चर्चा आहे. यासाठी उमेदवारांच्या घरोघरी जाऊन बोलणी व फोन सुरू असल्याची चर्चा सुरू आहे.

### ऍडजेस्टमेंट नेहमीचच

माढा तालुक्यातील ग्रामपंचायत, बाजार समिती, नगरपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, खरेदी विक्री संघ आदी निवडणुकांमध्ये नेहमीच ऍडजेस्टमेंटचे राजकारण होत आल्याचे आतापर्यंत दिसून आले आहे. यावर्षीही अशाच पद्धतीने ऍडजेस्टमेंट करून या निवडणुकीची ३० वर्षांची बिनविरोध निवडूका होण्याची परंपरा कायम ठेवतील का? हे येणाऱ्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चित्र स्पष्ट होईल.

### दिग्गज नेते निवडणुकीमध्ये

माढा तालुक्याचे सुपुत्र आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेने उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. करमाळ्याचे आमदार संजय शिंदे शिवसेनेचे संजय कोकाटे, विद्यमान उपसभापती सुहास पाटील, कुर्मुदास सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सुधीर पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शिवाजी पाटील, सिद्धेश्वर घुगे, शेतकरी कामगार पक्षाचे बाळासाहेब पाटील, प्रवीण पाटील असे दिग्गजांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.


# गौरव यात्रेतून भाजपाचे शक्तीप्रदर्शन; आंदोलनामुळे काँग्रेसमध्ये संचारली उर्जा

**अजित उंब्रजकर**

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वारंवार सावरकरांना अपमानित केल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा मुद्दा महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या राजकारणात पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सावरकर यांच्याबद्दल वारंवार अपशब्द काढणाऱ्या राहुल गांधी यांना चोख उत्तर देण्यासाठी भाजपातर्फे सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे. राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ काँग्रेसकडून आंदोलने सुरू आहेत. इतर शहर- जिल्ह्याप्रमाणे सावरकर विरुद्ध गांधी याप्रकरणामुळे गेल्या पंधरवड्यात सोलापूर शहरातील भाजपा आणि काँग्रेस आमने-सामने आली आहे.**

राहुल गांधी यांच्याकडून सावरकर यांचा वारंवार अपमान करण्याचा मुद्दा भाजपाने चांगलाच उचलून धरला आहे. यानिमित्ताने त्यांनी प्रखर हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करत संपूर्ण राज्यात सावरकर गौरव यात्रा काढण्यास सुरुवात केली आहे. सोलापूर शहरातही तिन्ही मतदारसंघातून सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. यामध्ये खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामी, आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले होते. शहरासह संपूर्ण जिल्ह्यातही सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. संबंधित आमदारांनी या यात्रेचे प्रतिनिधित्व केले. या गौरव यात्रेद्वारे भाजपाने एकप्रकारे आपले शक्तीप्रदर्शन केले. सोलापुरात या यात्रेमध्ये शिवसेनेचे नेतेही सामील झाल्याचे दिसून आले.

दुसरीकडे राहुल गांधी यांना संसदेतून तडकाफडकी निलंबित केले आणि त्यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावल्यामुळे काँग्रेसही आक्रमक झाली आहे. सोलापूर शहरातील काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्तेही चांगलेच पेटून उठले. गांधी यांच्या समर्थनार्थ काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते विविध आंदोलने करत आहेत. यामुळे एक प्रकारे काँग्रेसचे कार्यकर्ते चार्ज झाल्याचे दिसून येत आहेत. पोस्टकार्ड पाठवणे, राहुल गांधी यांच्या समर्थनात रिक्षावर बॅनर लावणे यासह विविध आंदोलने काँग्रेसने केली. आमदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ आंदोलन सुरू आहेत. माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनीही पत्रकार परिषद घेऊन भाजपवर चांगलीच टीका केली होती. सध्या सोलापूर शहरात काँग्रेसचे नेते एकीकडे पक्ष सोडून जात आहेत. असे असताना या आंदोलनाद्वारे अनेक काँग्रेसचे नेते एकत्र आल्याचेही दिसून आले. त्यामुळे गांधी प्रकरण एकंदरीत काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी उर्जितावस्था देणारे ठरले आहे.



### बॅनरबाजीनेही वेधले सोलापूरकरांचे लक्ष

सावरकर विरुद्ध गांधी असा वाद सोलापूर शहरात भाजपा आणि काँग्रेसमध्ये दिसून येत आहे. विशेष म्हणजे या दोघांच्या समर्थनार्थ करण्यात आलेल्या बॅनरबाजीमुळे सोलापूरकरांचे लक्ष वेधले. ज्या ठिकाणी काँग्रेसने राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ बॅनर लावले होते त्याच्या शेजारी भाजपने सावरकर गौरव यात्रेचे बॅनर लावल्याचे दिसून आले. त्यामुळे सोलापुरात अनेक वर्षांनंतर बॅनरबाजी दिसून आली.

# लोकोत्सव झालेल्या भगवंत महोत्सवाला राजाश्रयाची गरज

**सचिन अपसिंगकर**



बार्शीचे नगरदैवत भगवंत देवस्थान हे अखिल भारतीय पातळीवर भगवान श्री महाविष्णूचे अवतार मूर्ती असलेले एकमेव देवस्थान मानले जाते. या अकराव्या शतकातील हेमांडपंथीय बांधकाम असलेल्या मंदिरामुळे बार्शीला दक्षिण भारताची उत्तर काशी असे संबोधले जाते. तिथीनुसार श्री भगवंत जयंती प्रतिवर्षी साजरी केली जाते. भगवंत जयंतीनिमित्त बार्शी नगरपालिकेच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्याची जुनी परंपरा आहे. मध्यंतरी काही वर्षे ही परंपरा खंडीत झाली होती. त्यानंतर २०१७ साली विद्यमान आमदार राजाभाऊ राऊत यांच्या पाठबळामुळे बार्शी नगरपालिकेने या परंपरेची पुनरूज्जीवन केले. मात्र कोरोनामुळे पुन्हा खंड पडला. त्यानंतर गतवर्षी पुन्हा हा महोत्सव उत्साहाने साजरा झाला. सध्या नगरपालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपुष्टात आला. मात्र त्यानंतरही या विधायक परंपरेत आणि उपक्रमशिलतेमध्ये कोणताही खंड पडु द्यायचा नाही या निर्धाराने आमदार राऊत यांनी या महोत्सवाच्या संयोजनामध्ये पुढाकार घेतला.

नगरपालिकेकडून या महोत्सवाला १० लाख रूपये निधी मिळवून देण्यासाठी आमदार राऊत यांनी पाठपुरावा केला. या वर्षीही हा महोत्सव उत्साहाने आयोजित केला जात आहे. दि.२६ एप्रिल ते २ मे या कालावधीत हा महोत्सव बार्शी शहरात होणार आहे. या महोत्सवात भावगीते, भक्तीगीते, प्रवचन, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम, नाटके व स्थानके कलाकारांच्या गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या महोत्सवाला बार्शीकर प्रेक्षकांचा प्रतिवर्षी वाढता प्रतिसाद आहे. या महोत्सवात सादरीकरण होणाऱ्या कार्यक्रमात राज्यातील प्रथीत यश कलावंताचा सहभाग असतो. त्यामुळे या कार्यक्रमांवर होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकही मोठे आहे. पालिकेच्या माध्यमातून मिळणाऱ्या निधीचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे संयोजन शहरातील दानशूर व्यक्तींच्या देणग्यातून केले जाते. मात्र भगवंत महोत्सवाचा खर्च वाढतो आहे. अशा परिस्थितीमध्ये या महोत्सावाला मिळणारा लोकाश्रयही वाढतो आहे. केवळ प्रतिवर्षी शहरातील दानशूर व्यक्तींच्या आर्थिक मदतीमधून हा खर्च भागवणे सोपे नाही. त्यामुळे या महोत्सवाच्या कायमस्वरूपी संयोजनासाठी लोकनिधी उभारण्याची गरज तर आहेच पण त्याचबरोबर या लोकोत्सव झालेल्या भगवंत महोत्सवाला राजाश्रयाचीही गरज आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार हे प्राचीन परंपरा व संस्कृती याबाबत होणाऱ्या कार्यक्रमांच्या संयोजनाला पाठबळ देणार असल्याचे उभयतांनी जाहीर केले आहे. भगवंत महोत्सव हा पुणे फेस्टीवलच्या धर्तीवर भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्याची मागणी प्रतिवर्षी जोर धरत आहे. याचबरोबर या महोत्सवाच्या संयोजन समितीमध्येही शहराच्या विविध क्षेत्रातील व्यक्ती आपला तण, मन, धनाने सहभाग देण्यासाठी इच्छुक आहेत. त्यांनाही सामावून घेत हा महोत्सव अधिक सर्वसमावेशक आणि सर्वपक्षिय होण्याची गरज आहे. बार्शीचा भगवंत हा सर्वांचा आहे. त्यामुळे आपल्या या लोकदैवताच्या जयंतीनिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या या महोत्सवाबद्दल सर्व बार्शीकरांना आस्था आहे. त्यामुळे शासनाने या महोत्सवाची दखल घेवून विशेष निधी द्यावा,अशी सर्व बार्शीकरांची अपेक्षा आहे.